cmyk

## संपादकीय

### स्लिपर सेलचा धोका ओळखा !

काश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारत सरकारने जोरदार प्रत्युत्तर देण्याची तयारी केली आहे. काही कारवाया सुरूही केल्या आहेत. काश्मीरमधील दहशतवादी किंवा त्यांना पाठिंबा देणार्या स्थानिक नागरिकांना ताब्यात घेण्यात येऊन काही लोकांच्या मालमत्ताही उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत. ज्याप्रकारे पहलगाम हल्ल्यामध्ये काही स्थानिक नागरिकांनी दहशतवाद्यांना मदत केल्याचे उघडकीस आले आहे ते पाहता देशाच्या कानाकोपर्यातही काही महत्त्वाच्या शहरांमध्ये पाकिस्तानच्या पाठबळावर स्लीपर सेल अस्तित्वात आहेत आणि योग्य वेळ येताच हे स्लीपर सेल जागृत होऊन दहशतवादी कारवायांसाठी मदत करतात असे आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### एलएलबी ३ वर्षे सीईटी परीक्षा २ मे पासून

मुंबई : राज्यातील विधी महाविद्यालयात एलएलबी ३ वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची सीईटी ३ आणि ४ मे रोजी पाच सत्रात आयोजित करण्यात आली होती. त्यात सीईटी सेलने बदल करून ४ मे रोजी होणारी परीक्षा दोन दिवस आधी म्हणजेच २ मे रोजी घेतली जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे हॉलतिकीट आणि बदलण्यात आलेल्या तारखेची माहिती त्यांच्या ईमेल आणि एसएमएसच्या माध्यमातून दिली जाणार असल्याची माहिती सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी सोमवारी मुंबईत दिली. ४ मे रोजी नीट ची परीक्षा असून त्या दिवशी राज्यातील अनेक परीक्षा केंद्र यामुळे व्यापून राहणार आहेत, त्यामुळे एलएलबीची सीईटी देणा-या सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र आणि इतर अडचणी येत होत्या.

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–१० | मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# केंद्र सरकार गहू निर्यातीवरील बंदी कायम ठेवणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्र सरकार यंदाही गव्हावरील निर्यात बंदी कायम ठेवण्याची शक्यता आहे. त्यामुळे गहू निर्यातीची कोंडी यंदाही फुटण्याची चिन्हं दिसत नाहीत. प्रमुख गहू उत्पादक राज्यातील शेतकऱ्यांना फटका सहन करावा लागणार असल्याचं जाणकार सांगत आहेत. त्यामुळे जागतिक बाजारात भारताची बेभरवशाचा गहू पुरवठादार अशी झाली आहे.**



केंद्र सरकारने २०२४–२५ मध्ये भारतीय अन्न महामंडळामार्फत ३१.३ दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट निश्चित केलं आहे. मागील हंगामात गहू उत्पादन चांगलं राहिलं. त्यामुळे खरेदीचं उद्दिष्ट गाठता येईल, असा केंद्र सरकारचा दावा आहे. परंतु सार्वजनिक वितरण प्रणाली आणि

### गहू आणि तांदूळ वाटप

केंद्र सरकार अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गहू आणि तांदूळाचं वाटप करतं. त्यासाठी भारतीय अन्न महामंडळ गव्हाची खरेदी करतं. परंतु गव्हाचं उत्पादन घटल्याने सरकारने गव्हाऐवजी तांदूळ वाटपाचा टक्का वाढवला होता. यंदा मात्र केंद्र सरकार गहू आणि तांदळाचं वाटप प्रमाण समान करण्याची नियोजन करत आहे. त्यासाठी मागील दोन वर्षांच्या तुलनेत ४ दशलक्ष टन अतिरिक्त गव्हाची आवश्यकता भासणार आहे.

संरक्षित साठा वाढवण्यावर सरकारचा भर आहे. त्यामुळे केंद्र सरकार खरेदीचं उद्दिष्ट पूर्ण करूनही निर्यात बंदी उठवण्याची शक्यता नाही. २०२२ मध्ये जागतिक पातळीवर रशिया आणि युक्रेन संघर्षामुळं अन्नसुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला होता. त्यावेळी पंतप्रधान मोदींनी भारत जगाला अन्न पुरवेल, अशी जाहीर ग्वाही दिली. परंतु मे २०२२ मध्ये उष्णतेच्या लाटांमुळं गहू उत्पादनात काहीशी घट आली. त्यामुळे गव्हाच्या किंमती वाढतील, या भीतीने केंद्र सरकारने गहू निर्यातीवर घाईनं निर्यातबंदीची कुऱ्हाड चालवली. २०२२ च्या मेपासून गहू निर्यातीवर बंदीचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. तसेच यंदाही गव्हाचा दर नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्यात बंदी कायम ठेवण्यात येणार असून ६ ते ७ दशलक्ष टन गहू केंद्र सरकार खुल्या बाजारात उतरवण्याची केंद्र सरकारची तयारी आहे. केंद्र सरकारने २०२४–२५ मध्ये अंदाजे ३ दक्षलक्ष टन गव्हाची खुल्या पान २ वर

# पाकिस्तानची आता खैर नाही!

## भारत–फ्रान्समध्ये २६ राफेल मरीन लढाऊ विमानांच्या खरेदीवर शिक्कामोर्तब



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारत आणि फ्रान्सदरम्यान सोमवारी भारतीय नौदलासाठी सुमारे ६४ हजार कोटी रुपये किमतीच्या २६ राफेल मरीन लढाऊ विमानांच्या खरेदी करारावर शिक्कामोर्तब झाले. या कराराच्या स्वाक्षरी कार्यक्रमावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. या करारावेळी भारताकडून संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी प्रतिनिधित्व केले. नौदलाचे व्हाइस चीफ व्हाइस अॅडमिरल के. स्वामीनाथन यांचीही उपस्थिती होती.**

### अत्याधुनिक शस्त्र प्रणालींनी सुसज्ज

ही राफेल विमाने अत्याधुनिक शस्त्र प्रणालींनी सुसज्ज असतील. यात लांब पल्ल्याची हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध यांचा समावेश असेल. या करारानुसार भारतात विमाने निर्मिती करणे अनिवार्य नसले तरी, राफेलमध्ये सहभागी असलेल्या डसॉल्ट, थेल्स आणि एमबीडीए सारख्या फ्रेंच कंपन्या त्यांच्या भारतीय भागीदारांना स्थानिक पातळीवर उपकरणे आणि उपप्रणाली निर्मितीसाठी ऑर्डर देण्याची शक्यता आहे.

### युद्धनौकांवर हल्ला करण्यात तरबेज

या करारातर्गत २२ सिंगल सीट राफेल–एम आणि ४ डबल ट्रेनर सीट राफेल–एम विमाने भारताकडून खरेदी करण्यात येणार आहेत. हिंदी महासागरातच ही विमाने तैनात केली जाणार आहेत. युद्धनौका तसेच अणुप्रकल्पांवर हल्ला करण्यात ही विमाने तरबेज मानली जातात. आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवर या विमानांचा तळ असेल. याआधीही भारताने सप्टेंबर २०१९ मध्ये फ्रान्सकडून ३६ राफेल लढाऊ विमानांची खरेदी केली होती. त्यासाठी ५९ हजार कोटी रुपये मोजले होते.

या महिन्याच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय नौदलासाठी २६ अत्याधुनिक राफेल–मरिन लढाऊ पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या 'मंत्री' नावाची मंत्रालयातील पाटी कायम

## अंजली दमानियांचा सवाल, कार्यालय आणि पाटी कशासाठी ?




**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येप्रकरणी धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याच्यावर गंभीर आरोप झाल्याने मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मागण्यात आला होता. आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण तीव्रपणे मांडले. अखेर, सततच्या आरोपांमुळे मुंडे यांनी ६ मार्च २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा सादर केला, जो स्वीकारला गेला.**

मुंडे यांनी सोशल मीडियावर आरोग्याच्या कारणास्तव राजीनामा दिल्याचे जाहीर केले. मात्र, दोन महिन्यांनंतरही मंत्रालयातील त्यांच्या दालनाबाहेरील 'मंत्री' असलेली नावाची पाटी कायम असल्याने अंजली दमानिया यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. दमानिया यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ आणि फोटो पोस्ट करत प्रश्न उपस्थित केला, ''मुंडे यांचा राजीनामा स्वीकारला गेला, मग मंत्रालयात त्यांच्या नावाचे कार्यालय आणि मंत्री म्हणून पाटी कशासाठी आहे?'' त्यांनी यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला. बीडचे पालकमंत्रिपद अजित पवार यांनी स्वीकारले असून, ते सक्रियपणे काम करत आहेत. तरीही मुंडे यांच्या नावाची पाटी कायम असल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली पान २ वर

# मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधींचे पक्षावर नियंत्रण नाही का? भाजपचा प्रश्न



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यांचा वापर पाकिस्तानात भारताची बदनामी करण्यासाठी केला जात आहे. मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांचे पक्षातील नेत्यांवर नियंत्रण नाही का? असा प्रश्न विचारत भाजपने काँग्रेसवर आगपाखड केली आहे. यावेळी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारामय्या, महाराष्ट्रातील काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, रॉबर्ट वढेरा यांच्या वक्तव्याची पान २ वर

# एसटी महामंडळाची आर्थिक श्वेतपत्रिका काढा

## परिवहन मंत्री सरनाईक यांचे निर्देश खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत



**ठाणे । पतिनिधी**

एसटी महामंडळाचा सुमारे १० हजार कोटींचा संचित तोटा असून एसटीचे आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी, तसेच भविष्यातील नियोजन करता, एक आर्थिक श्वेतपत्रिका तयार करावी. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.

सोमवार दि. २८ एप्रिल रोजी एसटीच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीमध्ये प्रताप सरनाईक बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते. सरनाईक म्हणाले की, सुमारे दहा हजार कोटी संचित तोटा सहन करणा–या एसटी महामंडळाला कर्मचा–यांचे वेतन, वाहन खरेदी, टायर खरेदी, इंधन खरेदी, स्थानकाचे नूतनीकरण व इतर आस्थापना खर्चासाठी दररोज आर्थिक कसरत करावी लागत आहे. पान २ वर

# सोशल मीडियावरील अश्लीलता गंभीर समस्या

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला नोटीस

नवी दिल्ली । प्रतिनिधी

ओटीटी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्ट्रिमिंग होणाऱ्या अश्लील कंटेंटबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. यावर बंदी घालण्यासाठी केंद्राला योग्य पावले उचलण्याचे निर्देश देण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली होती. या जनहित याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, , एएलटीटी, एक्स (पूर्वीचे ट्विटर), फेसबुक, इन्स्टाग्राम, आणि इतर प्लॅटफॉर्म्सना नोटीस बजावली आहे.

सोमवारी (दि. २८ एप्रिल) सर्वोच्च न्यायालयाने ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील अश्लील कंटेंटचे नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेची दखल घेतली. त्यावर न्यायालयाने असे निरीक्षण पान २ वर

# वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधातील नवीन याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी वक्फ दुरुस्ती कायदा, २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या नवीन याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला. या प्रकरणी अगोदरच खूप याचिका दाखल झाल्या आहेत. म्हणून नवीन याचिका विचारात घेऊ शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते सय्यद अली अकबर यांना या प्रकरणीच्या पाच प्रलंबित याचिकांमध्ये हस्तक्षेप अर्ज दाखल करण्याची पान २ वर



# रणवीर अलाहबादियांचा पासपोर्ट परत करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी यूट्यूबर रणवीर अलाहबादियांना कामानिमित्त परदेशात जाण्यासाठी पोलिसांनी पासपोर्ट परत करावा, असा आदेश दिला. इंडियाज गॉट लॅटेंट यूट्यूब शो दरम्यान केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी आसाम आणि महाराष्ट्र सरकारने त्यांच्याविरुद्धचा तपास पूर्ण झाल्याचे न्यायालयाला सांगितले. यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर



सिंह यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ एप्रिल २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.५० क्विंटल | २,५२० | ३,००० | २,७५१ |
| ज्वारी/हायब्रिड: १८२.०० क्विंटल | १,६०० | २,६७५ | २,१७७ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१२५ | २,१२५ | २,१२५ |
| तूर : २३.५० क्विंटल | ६,५८१ | ६,७११ | ६,६४१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १०८.५० क्विंटल | १,९०० | २,७५४ | २,४१० |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: ३३.०० क्विंटल | ४,८०१ | ६,००० | ५,३८९ |

## प्राणीमात्रांचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्र्यांचं पशुधनांविषयीचं मातृवत 'वात्सल्य' आलं समोर !

# पंकजाताई मुंडेंनी स्विकारले दोन गोड पिलांचे पालकत्व

**परळी वै. । पतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची संवेदनाशीलता सर्व परिचित आहे. त्याचबरोबर त्यांचे श्वानप्रेमही सर्वांना ज्ञात आहे.एक व्यासंगी, परखड वक्ता, अभ्यासू खंबीर लोकनेता अशी प्रतिमा असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या अतिशय संवेदनाशील व मातृवत वात्सल्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अनुभूती अनेकवेळा येते.असाच काहीसा प्रसंग काल बघायला मिळाला. या प्रसंगातून व्यक्ती म्हणून पंकजाताईंचा प्राणीमात्रांबद्दलचा जिव्हाळा अन्? पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई म्हणून पशुधनांविषयीचे त्यांचे मातृवत 'वात्सल्य' समोर आले आहे.**

कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी स्वतःच्या घरी लेकरं सांभाळावे या पद्धतीने आठ श्वानांच्या पिलांचा सांभाळ केलेला होता.यापैकी दोन पिलं त्यांनी पंकजाताई मुंडे यांना देवू केली.श्वानप्रेमी असलेल्या पंकजाताई व त्यांचा सुपूत्र



आर्यमान यांना अतिशय आनंद झाला.या नविन दोन श्वानांच्या आगनमनाचा उत्साह व उत्सुकता त्यांना लागलेली होती. अतिशय भावनिकतेने व जिव्हाळ्याने कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी या पिलांचा सांभाळ केलेला होता. त्यांनाही या पिलांचा विरह सहन होणारा नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेत कोल्हापूरहून मुंबई पर्यंतचा प्रवास करत शिंदे कुटुंब ही पिले घेऊन आली. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी या पिलांना आणण्यात आले यावेळी सोनाली शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांचे पंकजाताईंनी कृतज्ञतापूर्वक अतिशय प्रेमाने स्वागत केले. त्याचबरोबर त्यांनी आणलेल्या रोजी आणि प्रिती या दोन श्वान पिलांचे मातृवत स्वागत केले. आपल्या कुटुंबात नव्या सदस्यांचे स्वागत करावे असा अतिशय उत्साहात प्रिती आणि रोझीच्या गृहप्रवेशाचा एक छोटेखानी आनंदी सोहळा यावेळी साजरा करण्यात आला. पंकजाताई मुंडे यांनी हळद कुंकू लावून त्यांचं आत्मीय स्वागत केलं. पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# स्लिपर सेलचा धोका ओळखा !

काश्मीरमधील पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर भारत सरकारने जोरदार प्रत्युत्तर देण्याची तयारी केली आहे. काही कारवाया सुरूही केल्या आहेत. काश्मीरमधील दहशतवादी किंवा त्यांना पाठिंबा देणार्या स्थानिक नागरिकांना ताब्यात घेण्यात येऊन काही लोकांच्या मालमत्ताही उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत. ज्याप्रकारे पहलगाम हल्ल्यामध्ये काही स्थानिक नागरिकांनी दहशतवाद्यांना मदत केल्याचे उघडकीस आले आहे ते पाहता देशाच्या कानाकोपर्यातही काही महत्त्वाच्या शहरांमध्ये पाकिस्तानच्या पाठबळावर स्लीपर सेल अस्तित्वात आहेत आणि योग्य वेळ येताच हे स्लीपर सेल जागृत होऊन दहशतवादी कारवायांसाठी मदत करतात असे आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे.

भारत सरकारने सर्वप्रथम भारताच्या कानाकोपर्यात कार्यरत असलेल्या स्लीपर सेलनासुद्धा निष्क्रिय करणे गरजेचे आहे. सीमेपलीकडून म्हणजेच पाकिस्तानमधून हाताच्या बोटावर मोजण्याइतके दहशतवादी प्रत्यक्ष कारवाईसाठी भारतीय हद्दीत प्रवेश करत असतात. एवढ्या कमी लोकांना कोणतीही मोठी दहशतवादी कारवाई यशस्वीपणे स्वबळावर पूर्ण करणे शक्य नसते. पण या दहशतवाद्यांना जेव्हा स्थानिक लोकांची मदत मिळते तेव्हा ही कारवाई यशस्वी होते असेच आजवर लक्षात आले आहे.

खूप वर्षांपूर्वी झालेला मुंबईमधील बॉम्बस्फोट असो किंवा २६ नोव्हेंबर रोजी झालेला मुंबईवरील दहशतवादी हल्ला असो किंवा संसदेवर झालेला हल्ला असो किंवा देशाच्या कानाकोपर्यात झालेले छोटे-मोठे दहशतवादी हल्ले असोत प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष कारवाईमध्ये जरी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या दहशतवाद्यांनी भाग घेतला असला तरी त्यांच्या पाठीशी काही स्थानिक लोक स्लीपर सेलच्या माध्यमातून उभे राहिलेले असतात. पैशाचे अमिष दाखवून किंवा धार्मिक अस्मितेच्या जोरावर या स्थानिक लोकांचे ब्रेन वॉशिंग करून त्यांना योग्य वेळी कामगिरीसाठी तयार राहण्याचा आदेश नेहमीच दिला जातो.

पाकिस्तानातून किंवा सीमेपलीकडून आलेल्या दहशतवाद्यांच्या वाहतुकीची सोय करणे किंवा त्यांच्या राहण्याची सोय करणे, त्यांना शस्त्रे आणि बॉम्ब उपलब्ध करून देणे अशी अनेक कामे या स्लीपरसेलच्या माध्यमातूनच पूर्ण केली जातात. अनेकदा देशांतर्गत दंगली घडवणे किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे आणि सामाजिक अशांतता निर्माण करणे यासाठीसुद्धा या स्लीपर सेलचा वापर केला जातो. स्लीपर सेलच्या सदस्यांना कोणताही विशिष्ट चेहरा नसल्याने त्यांना ओळखणेही तसे अवघड असते.

अर्थात गुप्तचर संस्थांना याबाबत काही दुवे मिळाले तर ते त्यांच्यापर्यंत निश्चितपणे पोहोचू शकतात. गृहमंत्री अमित शहा यांनी काही दिवसांपूर्वी दिलेल्या आदेशाप्रमाणे देशातील पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा जरी आदेश देण्यात आला असला, तरी हे पाकिस्तानी नागरिक स्लीपर सेलचे सदस्य नसतात तर याच नागरिकांपैकी काहीजण जे दहशतवाद्यांचे सहानुभूतीदार असतात ते आपल्या वास्तव्याच्या कालावधीमध्ये स्लीपर सेल निर्माण करून सदस्यांना योग्य वेळी तयार राहण्यासाठी संकेत देत असतात.

पहलगाम हल्ल्याची जबाबदारी आता द रेजिस्टन्स फोर्स या स्थानिक काश्मिरी संघटनेने नाकारली असली तरी या हल्ल्यामध्ये आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर संघटनेचा हात असल्याचेही काही पुरावे मिळत आहेत. आयएसआयचा आजवरचा कारभार पाहता ते भारतामध्ये कार्यरत असलेल्या त्यांच्या बिन चेहर्याच्या हेरांच्या माध्यमातून स्लीपर सेलची निर्मिती करण्यालाच प्राधान्य देत असतात. म्हणूनच सीमेपलीकडील शत्रूला धडा शिकवण्यापूर्वी प्राधान्याने या स्लीपर सेललासुद्धा शोधून बाहेर काढावे लागणार आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये भारतामध्ये बांगलादेशी घुसखोरांचे प्रमाणही वाढले आहे आणि हे घुसखोर जरी बांगलादेशमधून भारतात आले असले तरी त्यामागे पाकिस्तानची एखादी योजनाही असू शकते. म्हणूनच ज्याप्रमाणे पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्यास सांगण्यात आले आहे, त्याप्रमाणेच गेल्या काही वर्षांमध्ये भारतात आलेल्या बांगलादेशी घुसखोरांचीसुद्धा चौकशी करून त्यांनाही मायदेशी पाठवण्याचा विचार आता करण्याची गरज आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला आणि पाकिस्तानच्या पाठबळावर कार्यरत असलेला दहशतवादी संघटनांना जोरदार धडा शिकवण्याचा निर्धार केला असला, तरी तो संपूर्णपणे यशस्वी होण्यासाठी प्राधान्याने स्लीपर सेललासुद्धा संपूर्णपणे नेस्तनाबूत करावे लागणार आहे.ही कारवाई करत असताना कोणतीही सामाजिक अशांतता किंवा गैरसमज निर्माण होणार नाही याची काळजी घेऊनच देशाच्या कानाकोपर्यात लपून बसलेल्या किंवा दुसरा चेहरा समोर करून उघडपणे वावरत असणार्या या स्लीपर सेलचा मुखवटा बाजूला करून त्यांना कायद्याच्या कचाट्यात आणणे गरजेचे आहे.

या स्लीपर सेलना निष्क्रिय करणे म्हणजेच अर्धी लढाई जिंकण्यासारखे आहे हे लक्षात घेऊनच सरकारला आता आगामी रणनीती आखावी लागणार आहे. सीमेपलीकडील शत्रू आणि देशातील पाकिस्तान धार्जिणे शत्रू यांच्याशी एकदम लढा देणारी रणनीती तयार केली, तर दहशतवादी पुन्हा तोंड वर काढणार नाहीत.

# ज्या घरात संपत्ती,दया आहे तेथे लक्ष्मी राहते -ह.भ.प.एकनाथ महाराज

आष्टी । प्रतिनिधी

मिळालेल्या देहाचा सदुपयोग करा दुरुपयोग करू नका. देहाचा उपयोग उपभोगाकरिता केला तर मोठी हानी होते. पापाचा पैसा खाण्यासाठी पूर्ण गाव येते पण फेडण्याकरता स्वतःला जावे लागते त्यामुळे पाप करू नका.भगवान देता है तो छप्पर फाडके देता है और लेता है तो चमडी फाड कर लेता है.ज्या घरात संपत्ती आणि दया आहे त्याठिकाणी लक्ष्मी राहते. त्या घरमालकाने लक्ष्मीला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी लक्ष्मी बाहेर जात नाही.देवाचा प्रसाद मिळाल्यानंतर जीवनात दुःखाचा लवलेश शिल्लक राहत नाही.ज्यांनी शिवस्वरूप बाबांची प्रामाणिक सेवा केली त्यालाच काल्याच्या प्रसादाचा अधिकार आहे.प्रत्येक क्षेत्रामधील प्रत्येकाला वाटते की आपल्या क्षेत्रामध्ये पूर्णतः व्हावी पण तसे होत नाही. उदा,समुद्रामध्ये बारा महिने पाऊस पडला आणि सर्व नद्या समुद्राला मिळाल्या तरीही समुद्र भरत नाही आणि त्याच्या उलट बारा महिने पाऊस पडला नाही तरी पण समुद्रातील पाणी दोन इंच पण कमी होत नाही. देवाने दिलेल्या देहाचा सदपयोग कसा करावा हे संत संगतीत आल्या शिवाय कळत नाही.चोऱ्या कशा कराव्या हे पुढाऱ्यांना विचारा आणि जीवनाचे कल्याण कसे करावे हे साधू संताला विचारा देहाचा दुरुपयोग करू नका. माणसाने केलेल्या हत्येची परतफेड करावी लागते.देवाने श्रीमंती दिली पण दान केले नाही तर काय होते तर आता जे घाटावर भीक मागतात ते पूर्वी श्रीमंत होते त्यांनी कधी उष्ट्या हाताने कावळा हाणला नाही ते असतात.ग्रहस्थी माणसाच्या दारातून एखाद्या याचक विन्मुख गेला तर त्या याचकाचे काही होत नाही पण घर मालकाचे मागील पुण्य संपते.धाब्याचा काळ आला आणि अतिथी धर्म बुडाला घरचे माणसेच घरी जेवत नाहीत तर अतिथीला कुठून जेवण देणार ? असा प्रश्न उपस्थित करीत ज्या घरात संपत्ती, दया आहे तेथे लक्ष्मी राहते त्या घरमालकाने लक्ष्मीला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी लक्ष्मी बाहेर जात नाही असे प्रतिपादन ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री यांनी केले.



आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्या निमित्त दि.१९ ते २६ एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते. ह.भ.प.चतर शास्त्री बोलताना पुढे म्हणाले की, फुकट देणे हे भगवद्ग गीतेच्या विरोधात आहे.ज्ञानेश्वर महाराज सांगतात जी माणसे आपल्या पोटापुरते काम करत नाहीत ते देवाच्या दर्शनासाठी सुद्धा योग्य नाहीत. शासनाने फुकटचे काही देऊ नये, द्यायचेच असेल तर शेतीमालाला हमीभाव द्या सेंद्रिय औषध आणि खताचा टॅक्स कमी करा तरुणांच्या हाताला काम द्या.ज्यांनी शिवस्वरूप बाबांची प्रामाणिक सेवा केली त्यालाच काल्याच्या प्रसादाचा अधिकार आहे. प्रत्येक क्षेत्रामधील प्रत्येकाला वाटते की आपल्या क्षेत्रामध्ये पूर्णतः व्हावी पण तसे होत नाही. उदा,समुद्रामध्ये बारा महिने पाऊस पडला आणि सर्व नद्या समुद्राला मिळाल्या तरीही समुद्र भरत नाही आणि त्याच्या उलट बारा महिने पाऊस पडला नाही तरी पण समुद्रातील पाणी दोन इंच पण कमी होत नाही. देवाने दिलेल्या देहाचा सद उपयोग कसा करावा हे संत संगतीत बसल्याशिवाय कळत नाही.चोऱ्या कशा कराव्या हे पुढाऱ्याला विचारा आणि जीवनाचे कल्याण कसे करावे हे साधूला विचारा देहाचा दुरुपयोग करू नका. माणसाने केलेलया हत्येची परतफेड करावी लागते.देवाने श्रीमंती दिली पण दान केले नाही तर काय होते तर आता जे घाटावर भीक मागतात ते पूर्वी श्रीमंत होते त्यांनी कधी उष्ट्या हाताने कावळा हाणला नाही ते असतात.ग्रहस्थी माणसाच्या दारातून एखाद्या याचक विन्मुख गेला तर त्या याचकाचे काही होत नाही पण घर मालकाचे मागील पुण्य संपते.धाब्याचा काळ आला आणि अतिथी धर्म बुडाला घरचे माणसेच घरी जेवत नाहीत तर अतिथीला कुठून जेवण देणार असेही शेवटी शास्त्री महाराज म्हणाले. यावेळी माजी आ.साहेबराव दरेकर,देविदास धस,सेवानिवृत्त आयुक्त सुनील चव्हाण,सतीष शिंदे,डॉ. शिवाजी राऊत,दशनाम गोसावी संघटनेचे बीडचे संस्थापक अध्यक्ष ॲड.राजेंद्र बन, ह.भ.प.ब्रम्हचैतन्य महाराज तावरे,आष्टी दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, उद्योगपती अण्णासाहेब चौधरी, उद्योगपती संदीप गोसावी (पुणे), बाळासाहेब बनगे (तलाठी),सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच आदिकाताई लोखंडे,माजी सरपंच मनीषा मुटकुळे (मांडवा),दिलीप फौजी मुटकुळे, ह.भ.प.श्रीहरी महाराज पुरी, ह.भ.प.शिवाजी कोकणे महाराज, ह.भ.प.पांडुरंग भालके महाराज,नाना महाराज भोगाडे,तुकाराम भोसले महाराज,परसराम महाराज बन,अंकुश बन अकलूज, सायकड सर,प्रशांत शेंडगे (पुणे),रिटायर मेजर रामदास चव्हाण,डॉ.दत्तात्रय भोसले, रामदास बन,राजेंद्र बन, वसंत बन,आबासाहेब साप्ते,दिलीप गिरीसर,भागवत गिरी,रामनाथ बन,संजय गिरी,जालिंदर सोमासे,सूर्यभान धुमाळ आदी हजारो भाविक भक्त उपस्थित होते.यावेळी सूत्रसंचालन दिलीप गिरी सर यांनी केले. मान्यवरांचे व महाराजांचे सत्कार रामनाथ बन,अमोल बन,सदाशिव बन, आबा सापते, भागवत गिरी,रवि बन यांनी केले.हा सप्ताह यशस्वी होण्यासाठी शिवस्वरूप सप्ताह कमिटी आणि तरुण मंडळाने परिश्रम घेतले. या सप्ताहामध्ये पुढील वर्षासाठी नारळ उचलले रामनाथ बाबुराव बन १ लाख ११ हजार १११ रुपये, विठ्ठल युवराज गिरी (राजशिष्टाचार अधिकारी पुणे) यांचे १ लाख ११ हजार १११ रुपये,पत्रकार कै. दादासाहेब आत्माराम बन यांच्या स्मरणार्थ उमेश आत्माराम बन यांच्याकडून ५१ हजार रुपये जाहीर करण्यात आले.

# मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे आयोज

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार- उद्योग मंत्री उदय सामंत

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.**

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे. उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे.

# चंद्रसेन तिपटे यांची संजय गांधी श्रावणबाळ समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्याची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील गरजू, निराधार, वृद्ध व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी कार्य करणाऱ्या चंद्रसेन तिपटे यांची संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजना पाटोदा तालुका समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सध्या सर्वसामान्य जनतेकडून केली जात आहे.चंद्रसेन तिपटे हे लोकप्रिय आमदार सुरेश अण्णा धस यांचे कट्टर समर्थक असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही वर्षांपासून निराधार व गरीब लोकांसाठी सातत्याने कार्य करत आहेत. त्यांच्या प्रयत्नातून आतापर्यंत तीन ते चार हजार लाभार्थ्यांना या योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यात यश आले आहे.चंद्रसेन तिपटे हे सामाजिक कार्यात अग्रेसर असून, त्यांनी अनेक वेळा शासनाच्या विविध योजनांची माहिती घरोघरी पोहोचवून गरजूंना लाभ मिळवून दिला आहे. त्यांच्या कामातील पारदर्शकता, कार्यक्षमता व जनसंपर्कामुळे तालुक्यात त्यांची एक विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर,अशा लोकाभिमुख व कार्यतत्पर व्यक्तीची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यास, पाटोदा तालुक्यातील अधिकाधिक गरजूंना योजनांचा लाभ मिळू शकतो, अशी आशा स्थानिक नागरिक, ज्येष्ठ नागरिक,निराधार महिला व युवकांनी व्यक्त केली आहे.

# पान १वरून...


### केंद्र सरकार गहू निर्यातीवरील बंदी

बाजारात विक्री केली. तर २०२३-२४ मध्ये १० दशलक्ष टन गहू विक्री केली. त्यामुळे गहू दर नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. परिणामी मागील तीन वर्षात गव्हाच्या बाजारात मोठी आणि दीर्घकाळ तेजी पाहायला मिळाली नाही. केंद्र सरकारने २०२१-२२ मध्ये विक्रमी ४३.३४ दशलक्ष टन गहू खरेदी केला. परंतु मागील तीन वर्षात मात्र सरकारला खरेदीचं उद्दिष्ट पूर्ण करता आलं नाही. केंद्र सरकारने २०२२-२३ मध्ये ४४.४ दशलक्ष टन गहू खरेदीचं उद्दिष्ट निश्चित केलं. प्रत्यक्ष खरेदी मात्र १८.७९ दशलक्ष टनच केली. २०२३-२४ मध्ये खरेदीचं उद्दिष्ट ३४.१५ दशलक्ष टन होतं. परंतु खरेदी मात्र २६.२ टनच केली. तर २०२४-२५ मध्ये उद्दिष्ट ३७.३ असताना खरेदी केवळ २६.६१ दशलक्ष टन झाली आहे. परंतु चालू खरेदी हंगामात मात्र गहू खरेदी १९.८६ दशलक्ष टनांवर पोहचली आहे. मागील वर्षी मात्र याच दरम्यान गहू खरेदी १३.५८ दशलक्ष टन होती. यंदा मात्र त्यामध्ये ४६ टक्के वाढ झाली आहे. परंतु तरीही केंद्र सरकार गहू निर्यात बंदी कायम ठेवण्याच्या तयारीत आहे. दरम्यान, अन्न महामंडळाकडे १ एप्रिलपर्यंत ११.७९ दशलक्ष टन गव्हाचा साठा होता. मागील वर्षी याच कालावधीत ७.५ दशलक्ष टन होता. तसेच यंदाचं गहू खरेदीचं खरेदी उद्दिष्ट ३१.२७ दशलक्ष टन ठेवण्यात आलं आहे. कारण २०२४-२५ मध्ये गहू उत्पादनाचा विक्रमी ११५.१३ दशलक्ष टनाचा अंदाज होता.

--------

### धनंजय मुंडेंच्य 'मंत्री'

आहे. या प्रकरणाने महायुती सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दमानिया यांनी मंत्रालयातील ही विसंगती तातडीने दूर करावी, अशी मागणी केली आहे, तर नागरिकांमध्येही याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

--------------

### पाकिस्तानची आता

विमानांच्या खरेदीला मंजुरी दिली होती. या स्पर्धात्मक प्रक्रियेत अमेरिकन बोईंग एफ/ए १८ सुपर हॉर्नेटचाही समावेश होता. पण भारतीय नौदलाने राफेल लढाऊ विमानांची निवड केली. राफेल हे भारतीय आवश्यकतेनुसार अधिक योग्य असल्याचे आढळून आले. त्यामुळे राफेलची निवड करण्यात आली आहे.

------------

### सोशल मीडियावरील

नोंदवले की, या समस्येमुळे गंभीर चिंता निर्माण झाली आहे. त्यावरील उत्तरात केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की आणखी काही नियम विचाराधीन आहेत. जनहित याचिकेतून महत्त्वाचा चिंतेचा मुद्दा उपस्थित केला आहे.'' असे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती एजी मसीह यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम, अल्टबालाजी, उल्लू डिजिटल, मुबी आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म कॉर्प, गुगल, मेटा इंक आणि ॲपल यांना नोटीस बजावली. याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वकील विष्णू शंकर जैन यांनी म्हटले की, हे प्रकरण विरोधी खटला म्हणून नाही तर खरोखरच चिंता निर्माण करणारे आहे. कोणत्याही प्रकारचे नियमन अथवा नियंत्रण नसलेल्या सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या कंटेंटच्या मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. यावेळी न्यायमूर्ती गवई यांनी केंद्र सरकारची बाजू ऐकून घेतली. ''मिस्टर सॉलिसिटर? काहीतरी करा...याबाबत काहीतरी कायदे करावेत..'' अशी विचारणा न्यायमूर्ती गवई यांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केली.

**सेन्सॉरशिप नसावी का?**

यावर सॉलिसिटर जनरल मेहता म्हणाले की, काही नियमित कार्यक्रमांमध्येही अश्लील कंटेंटचा समावेश असतो. काही कार्यक्रम इतके विकृत स्वरुपाचे असतात की ते दोन सभ्य पुरुष एकत्र बसून ते पाहू शकत नाहीत, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सेन्सॉरशिप नसावी का? यावर सहमती दर्शवत एसजी मेहता म्हणाले की काही मर्यादेपर्यंत नियमन आवश्यक आहे. काही नियमन विचाराधीन आहेत. न्यायालयाने त्यांच्या आदेशात असे निरीक्षण नोंदवले की, ''ही याचिका ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावरील विविध आक्षेपार्ह, अश्लील आणि असभ्य कंटेंट दाखवण्यावरून चिंता उपस्थित करणारी आहे. यावर मेहता यांनी स्पष्ट केले आहे की हा विषय विकृतीच्या मर्यादा ओलांडणारा आहे. आणखी काही नियम विचाराधीन असल्याचे त्यांनी नमूद केले.''

-------------

### एसटी महामंडळाची आर्थिक

कर्मचा-यांचे देणी, भविष्य निर्वाह निधीचे हप्ते, कामगार करारातील प्रलंबित देणी यासाठी महामंडळाला पैशाची गरज आहे. याबरोबरच महामंडळाला इंधन, वस्तु व सेवा पुरविणा-या संस्थांची थकीत देणी या सर्व घटकांचा विचार करून एसटी महामंडळाला सध्या किती उत्पन्न मिळते? किती खर्च येतो? तसेच किती देणी बाकी आहेत. या सर्वांचा लेखा-जोखा मांडणारी एक श्वेतपत्रिका काढणे अत्यंत आवश्यक असून त्यातून एक आर्थिक शिस्त निर्माण करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

**भाडेतत्त्व प्रकरणाची त्रयस्थ व्यक्ती मार्फत चौकशी**

नुकत्याच संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहाला आश्वासित केल्याप्रमाणे १,३१० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या एकूण प्रकरणाची चौकशी तटस्थ व्यक्ती मार्फत केली जाईल, तशा सूचना अतिरिक्त मुख्य सचिव(परिवहन) यांना देण्यात येतील अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिली.

**दिघे कॅशलेस मेडिक्लेम योजना**

कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर सर्व कर्मचा-यांना एकाच छताखाली वैद्यकीय सेवा सुविधा व वैद्यकीय चाचण्या करून मिळतील अशी कॅशलेस मेडिक्लेम योजना धर्मवीर आनंद दिघे यांच्या नावाने सुरू करावी असे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी एसटी प्रशासनाला दिले.

**हॉटेल-मोटेल संदर्भात नवे धोरण लवकरच**

लांब पल्ल्याच्या प्रवासामध्ये एसटी बसेस ज्या हॉटेल-मोटेल वर थांबतात, तेथे प्रवाशांना दिल्या जाणा-या सेवा सुविधांबाबत अनेक तक्रारी निर्माण होत असून या हॉटेल-मोटेलना परवानगी देत असताना यापुढे कडक धोरण स्वीकारले जाईल. ज्यामध्ये प्रवाशांच्या तक्रारी नुसार संबंधित हॉटेलवर दंडात्मक कारवाई बरोबरच त्यांचा थांबा रद्द करण्याची देखील तरतूद असणार आहे. तसेच ज्या विभागात अशा हॉटेल-मोटेल संदर्भात तक्रार येतील त्या विभाग नियंत्रकांना देखील जबाबदार धरून त्यांच्यावर देखील प्रमादिय कारवाई करण्याची तरतूद या नव्या धोरणात असणार आहे अशी माहिती सरनाईक यांनी यावेळी दिली.

**५ तज्ज्ञांची लवकरच नियुक्ती**

एसटी प्रशासनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला अत्यंत महत्त्वाचा असून अशा तज्ज्ञांना एसटी महामंडळाच्या अधिकारी व प्रशासनाला मार्गदर्शन करण्यासाठी नेमले जावे अशा सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी या बैठकीत दिल्या. त्यानुसार बांधकाम, वाहतूक, कामगार, आर्थिक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी प्रत्येकी एक अशा प्रकारे पाच तज्ज्ञांची नियुक्ती लवकर महामंडळातर्फे करण्यात येणार आहे.

----------

### मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधींचे पक्षावर

उदाहरणे दिली. भाजप नेते रविशंकर प्रसाद यांनी पक्ष मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना प्रसाद म्हणाले की, पहलगाममध्ये घडलेली दुर्दैवी घटना संपूर्ण देशाने पाहिली आणि संपूर्ण देशात याविषयी संताप आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बि४मध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की दहशतवाद्यांवर कठोर कारवाई केली जाईल. मात्र काँग्रेसचे नेते बेताल वक्तव्य करत आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणतात की, युद्ध होऊ नये तर कर्नाटकचे दुसरे नेते म्हणतात की दहशतवाद्यांनी लोकांना मारताना त्यांचा धर्म विचारला नाही. महाराष्ट्र काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने सांगितल्यानुसार दहशतवाद्यांनी लोकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या चालवल्या मात्र त्यांच्याकडे एवढा वेळ आहे का? काही लोकांच्या मतानुसार असे झाले नाही. मृतांचे कुटुंबीय रडून हे सत्य सांगत आहेत तेव्हा महाराष्ट्रातील नेते अशी विधाने करत आहेत जी असंवेदनशीलतेची परिसीमा आहे. रॉबर्ट वढेरा देखील त्यांची बुद्धिमत्तेचे दर्शन घडवत आहेत. देशात मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असल्याने अशा घटना घडतात, असे ते म्हणतात. मणिशंकर अय्यरही काही तरी बोलतात, या लोकांनी ही बुद्धी कशी सुचते, असा प्रश्नही रविशंकर प्रसाद यांनी विचारला. रविशंकर प्रसाद म्हणाले की, एकीकडे मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी सर्वपक्षीय बैठकीत सरकारसोबत असल्याचे सांगतात. ही प्रगल्भ राजकारणाची ओळख आहे मात्र काँग्रेसमध्येच इतर नेते काहीही बोलत आहेत. त्यांच्या सर्व विधानांचा गैरवापर पाकिस्तानात केला जात आहे. तिथल्या माध्यमांमध्ये एक मोहीम सुरू आहे. जेव्हा देशाने एका सुरात बोलायला हवे तेव्हा काँग्रेस नेते असे अनपेक्षित वक्तव्य करत आहेत. काँग्रेस नेतृत्व काय करत आहे. सिद्धरामय्या किंवा इतर नेत्यांना पक्षाने काही प्रश्न विचारले का, कोणाला जाहीरपणे माफी मागण्यास सांगितले आहे का? असे प्रश्न विचारत या सर्व वक्तव्याचा निषेधही रविशंकर प्रसाद यांनी केला.

------------

### रणवीर अलाहबादियांचा पासपोर्ट परत

खंडपीठाने अलाहबादिया यांना त्यांचा पासपोर्ट परत घेण्यासाठी महाराष्ट्र सायबर पोलिस ब्युरोशी संपर्क साधण्यास सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने अलाहबादिया यांच्या वतीने उपस्थित असलेले वरिष्ठ वकील अभिनव चंद्रचूड यांना सांगितले की, त्यांच्या अशिलाविरुद्धचे एफआयआर एकत्रित करण्याची आणि पुढील सुनावणीत ते एकाच ठिकाणी आणण्याची त्यांची विनंती विचारात घेतली जाईल. दरम्यान, १८ फेब्रुवारी रोजी, सर्वोच्च न्यायालयाने अलाहबादिया यांना एका यूट्यूब शो दरम्यान केलेल्या टिप्पण्यांवरून दाखल केलेल्या अनेक एफआयआरमध्ये अटकेपासून संरक्षण दिले होते. त्यांना त्यांचा पासपोर्ट पोलिसांकडे जमा करण्याचे निर्देश दिले होते. ही अट आता शिथील करण्यात आली आहे.

------------

### वक्फ दुरुस्ती कायद्याला विरोधातील नवीन

मुभा दिली. वक्फ दुरुस्ती कायदा विरोधातील याचिकांवर ५ मे रोजी सुनावणी होणार आहे. दरम्यान, १७ एप्रिल रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठाने म्हटले की, या प्रकरणी याचिका दाखल होणे सुरुच आहे. न्यायालय केवळ ५ याचिकांवर सुनावणी करेल. तसेच या प्रकरणाला कोणत्याही याचिकाकर्त्यांच्या नावाने नाही तर 'वक्फ दुरुस्ती विधेयक' प्रकरण म्हणून ओळखले जाईल. यावेळी न्यायालयाने केंद्राला ७ दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करण्या सांगितले होते. त्यानुसार २५ एप्रिल रोजी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळण्याची मागणी सरकारने न्यायालयाकडे केली. संसदेने पारित केलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीवर सविस्तर सुनावणीशिवाय आणि अंतिम निर्णयापूर्वी अंतरिम स्थगिती दिली जाऊ शकत नाही, असे सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले. वक्फ दुरुस्ती कायद्यामुळे धार्मिक हस्तक्षेप होणार नाही, असे १,३३२ पानांच्या प्राथमिक प्रतिज्ञापत्रात सरकारने म्हटले आहे.

------------

### प्राणीमात्रांचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्र्यांचं

मुक्या प्राण्यांनाही आत्मिय ओढ असते आणि विरहाची पण संवेदना असते. हे या एकाच अतिशय भावनिक प्रसंगात दिसून आले. कोल्हापूरच्या मोकळ्या वातावरणात जडणघडण झालेली व राहिलेली ही पिले मुंबईच्या वातावरणात कशी राहतील असा प्रश्न सर्वांनाच पडलेला असताना मात्र पंकजाताई मुंडे यांच्या जिव्हाळ्याने ही पिले त्यांना लगेचच बीलगल्याचे दिसून आले. शिंदे कुटुंबीय या पिलांना सोडून गेल्यानंतर या पिलांना सुरक्षित वाटावे यासाठी स्वतः पंकजाताई मुंडे व त्यांचा मुलगा आर्यमान यांनी या पिलांना बराच वेळ सहवासही दिला. याबाबतचा एक भावनिक असा व्हिडिओही पंकजाताई मुंडे यांनी सोशल माध्यमातून शेअर केला. नव्या सदस्यांचे अगदी संवेदनशीलपणाने मातृवत स्वागत आणि काळजी घेतानाच्या पंकजाताई मुंडे यात दिसून येत आहेत. हे सर्व पाहताना शिंदे कुटुंबीय अगदीच भारावून गेल्याचे दिसुन येत आहे. दरम्यान सोनाली शिंदे युट्यूबर असुन त्यांनीही एका व्हिडिओद्वारे पंकजाताई मुंडेंच्या या प्राणीप्रेमाचे व संवेदनाशीलतचे भरभरून कौतुक केले आहे. पोटच्या लेकरांप्रमाणे ज्या पिलांचा आपण सांभाळ केला आता त्यांना अतिशय छान घर आणि पंकजाताईंसारखे मातृवत प्रेम करणारे पालक मिळाल्याचा अतिशय आनंद झाल्याचे म्हटले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५



## चार जणांनी डोक्यात दगड घालून विधीसंघर्षित मुलाला संपवलं; नाशिकमध्ये दिवसाढवळ्या रक्तरंजीत थरार

नाशिक । प्रतिनिधी

शहरात एक संतापजनक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. शहराच्या कामटवाडे परिसरात दिवसाढवळ्या एका विधीसंघर्षित बालकाची डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे नाशिक शहरात एकच खळबळ उडाली आहे. दोन गटांमध्ये झालेल्या वादातून हत्या शक्यता व्यक्त केली जात आहे. मृत तरुणाचे नाव किरण चौरे असे असून, तो सराईत गुन्हेगार असल्याची माहिती मिळत आहे. हल्ला करणाऱ्या चार तरुणांनी मिळून किरण चौरे याच्यावर दगडाने वार केले. यामुळे त्याचा मृत्यू झाला. हल्ल्यानंतर मारेकरी घटनास्थळावरून फरार झाले आहेत. या प्रकारानंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. घटनेची माहिती मिळताच अंबड पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व अंगांनी तपास करत आहेत आणि मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. ही घटना दिवसाढवळ्या घडल्याने पोलिसांच्या गस्त आणि सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# भाजपाने तुम्हाला सन्मान दिला, तुम्ही आता पक्षाचे संघटनात्मक काम वाढवा-राम कुलकर्णी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**केज विधानसभा मतदारसंघातील मंडळ प्रमुखाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा सन्मान करण्यासाठी अक्षय निवासस्थानी तातडीची बैठक बोलाविण्यात आली. ज्यामध्ये पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची उपस्थिती होती.**

या बैठकीत बोलताना प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने सन्मानाचं पद देवून विश्वास टाकल्यानंतर शहरात आणि तालुक्यात संघटनात्मक कामात कठोर परिश्रम घेतले तर नेतृत्व बळकट होते. त्याचबरोबर संघटना देखील मजबूत होवू शकते. नविन पदाधिकार्यांनी काम करताना आपल्या लोकनेत्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे आणि या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना केंद्र आणि राज्य सरकारने हाती घेतलेल्या विकास योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याची आपली जबाबदारी निश्चितच असते. मंडळाच्या माध्यमातून मिळालेली जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्षमपणे पार पाडली तर खर्या अर्थाने तळागाळापर्यंत आपला विचार निश्चित पोहोचल्याशिवाय रहाणार नाही असे त्यांनी सांगितले. या मतदारसंघातील मंडळाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर अक्षय निवासस्थानी आमदारांच्या वतीने नुतन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेवून त्यांचा सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहर मंडळाच्या अध्यक्षपदी - संजय गंभीरे, अंबाजोगाई पश्चिम मंडळाच्या अध्यक्षपदी - गोकुळ कदम, तर केज पुर्व मंडळ अध्यक्षपदी - भगवान केदार, केज पश्चिम - संदिप पाटील, बालाघाट बीड - राणा डोईफोडे,



नेकनूर - अशोक रसाळ आदींच्या निवडी जाहिर झाल्या. यापैकी काही मंडळ अध्यक्ष उपस्थित झाल्यानंतर त्यांचा जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांनी शाल, श्रीफळ, फेटा बांधुन सन्मान केला. बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले की, आपण राज्यात नव्हे तर देशात सर्वात मोठ्या सदस्य संख्या असलेल्या पक्षाचे कार्यकर्ते असुन राज्यात दिड कोटी आपली सदस्य झाले ज्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात नेत्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई, माजी खासदार डॉ.प्रितमताई आणि आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली काम करताना सदस्य नोंदणीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संघटनेत मिळालेली पदं खर्या अर्थाने चांगलं काम करण्यासाठी संधी असते. भाजपाचे संस्कार आणि विचार हा खर्या अर्थाने सामान्य जनतेमध्ये आपणच घेवुन जावु शकतो. ज्यांना पदं मिळाली त्यांनी आपल्यावर आलेली जबाबदारी आणि कर्तव्य भावनेतून निश्चित चांगले काम करायला हवे. मंडळ अध्यक्ष या नात्याने सर्वांना सोबत घेवुन काम तर करणे महत्वाचेच त्याहुन अधिक भाजपाचा अध्यक्ष हा जो सामान्य जनतेतला विश्वास तो टिकवण्यासाठी सर्वांग चौकटीत राहुनच काम करणे महत्वाचे. बीड जिल्ह्यात आपल्या नेतृत्वाने मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली. केज विधानसभा मतदारसंघात देखील आमदारांनी प्रचंड विकासनिधी आणला. खर्या अर्थाने जनतेपर्यंत घेवून गेलं पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे हे आपलंच काम असून नविन पदाधिकार्यांनी क्रियामान, क्रियाशीलता वाढवुन निष्ठेने काम केले तर आपलं नेतृत्व आणि संघटना बळकट झाल्याशिवाय रहात नाही हा सल्ला त्यांनी दिला. यावेळी केज बाजार समितीचे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, हिंदुलाल काकडे, ॲड.शरद इंगळे, महादू मस्के, पंडितराव जोगदंड, शंकर उबाळे, ॲड.शरदराव इंगळे, राणा चव्हाण, आण्णा सोनवणे, अनंत आरसुडे, सुभाष घुंडरे, बाबासाहेब शेळके, प्रशांत आदनाक, शिरीष मुकडे, गणेश रूद्राक्ष, सुनिल मस्के, गौरव लामतुरे, सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, महेश आंबड, माऊली वैद्य, विकास जाधव, शैलेष स्वामी, संतोष जिरे, दिपक कोरडे, सुनिल आडसुळ, संतोष शिनगारे, अभय केंद्रे, सोपान मोरे, योगेश कडबाने, दिपक सुरवसे, विलास काजगुंडे, राहुल कापसे, मयुर रणखांब, निकेश जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडींचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

## बालसंस्कार शिबिराचे आयोजन -ह.भ.प.गोविंद महाराज सुरवसे

बीड । प्रतिनिधी

माजलगाव शहरात भव्य दिव्य बालसंस्कार शिबिराचे आयोजन, आदर्श देवगाव नगरीचे भूमिपुत्र ह,भ,प, गोविंद महाराज सुरवसे यांनी आयोजित केले आहे, सदरील शिबिर २.मे ला चालू होणार आहे व शिबिर कालावधी वीस दिवसाच असणार आहे, या शिबिरामध्ये वारकरी संप्रदायातील विषय शिकवले जाणार आहेत, यामध्ये हनुमान चालीसा, हरिपाठ, पखवाज भगवद्गीता, वारकरी पावल्या, व्याख्यान, वारकरी चाली योगासने, संत कथा, इत्यादी विषय शिकवले जाणार आहेत, या शिबिराला विशेष सहकार्य राजकीय सामाजिक शैक्षणिक शेतकरी बांधवानी केलेला आहे, दि, २०.०५.२०२५. रोजी सकाळी नऊ ते अकरा बाबा महाराज राऊत यांचे काल्याचे किर्तन होईल सदरील कार्यक्रम, माऊली गुरुकुल जुन्या पूर्णवादी बँकेजवळ शाहूनगर माजलगाव परिसरात होईल, तरी या शिबिराच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आव्हान आयोजक भागवताचार्य ह ,भ ,प गोविंद महाराज सुरवसे, ८८८८०५३९१७. याप्रमाणे संपर्काद्वारे आव्हान यांनी केले आहे.



## प्रशासकिय मान्यता नसताना सुध्दा टेंडर काढणाऱ्या भागवत जाधववर कडक कारवाई करा -मुकुंद भोसले

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगर पालिकेच्या भंडार विभागा मार्फत तब्बल २० प्रकारच्या साहित्याची खरेदी करावयाचे टेंडर काढण्यात आलें होते. त्याचा मोठा बोभाटा झाल्यानंतर सदरील टेंडरला प्रशासकिय मान्यताच नव्हती असा धक्कादायक प्रकार समोर आला असून प्रशासकिय मान्यता न घेता टेंडर काढणार्या अंधारे मॅडम व भंडारपाल भागवत जाधव वर आता प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा शिवराजे जनकल्याण ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष मुकुंद भोसले यांनी केली आहे.**

अ प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात भोसले यांनी म्हटले आहे की, दि.२५ मार्च रोजी बीड न.प.च्या भांडार विभागा मार्फत ई निविदा काढण्यात आली. या निविदेत न.प.च्या विविध विभागातील कर्मचारी, सफाई कामगार व महिलांकरीता २१ लाखाच्या साड्या खरेदी करणे, जलशुध्दीकरण केंद्रासाठी तुरटीसाठी १६ लाख, मलेरिया व जंतुनाशके साठी ७० लाख,छपाई साहित्यासाठी ३० लाख, लिखान साहित्यासाठी २५ लाख, लोखंडी साहित्यासाठी २३ लाख,वाहनांच्या दुरुस्तीसाठी ४५ लाक, संगणक साहित्यासाठी २५ लाख,क्लोरीन गॅससाठी १५ लाख, आणि चारचाकी वाहने किरायाने लावण्यासाठी ४२ लाख असे विविध साहित्याचे टेंडर काढण्यात आले होते. वास्तविक पाहता हे टेंडर काढताना प्रशासकिय मान्यतेची आवश्यकता असते. मात्र अंधारे मॅडम व भांडारपाल भागवत जाधवने कोणालाही न विचारता परस्पर टेंडर काढून मलिदा लाटण्याचा प्रयत्न करणार्या भागवत जाधववर प्रशासन कधी कारवाई करणार असा सवाल भोसले यांनी केला आहे.

अ सध्या बीड नगरपालिकेने जे टेंडर काढले होते ते एसडीओ मॅडम यांनी रद्द केले आहेत ही गोष्ट चांगली आहे परंतु जे टेंडर काढले त्याला प्रशासकीय मान्यता नव्हती हे सर्व बीड शहरातील नागरिकांना माहिती आहे मग टेंडर काढणार्या

अ उे अंधारे मॅडम वरती व बीड नगरपालिका लुटून खाणार्या भागवत जाधव वरती तुम्ही कायदेशीर कारवाई करणार का अ बीड शहरातील नागरिक पाण्यापासून वंचित राहत आहेत आणि नगरपालिकेतील अधिकार्यांनी कर्मचारी यांना कशातच घेणं देणं नाही यांना फक्त स्वतःची खिसे गरम करायचे आहे.

## मानव धर्म उन्नतीसाठी हरिनाम सप्ताहाचे योगदान -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी संतानी आचार विचारातुन मानवतेचा खरा संदेश दिला. संताचं जीवन मानवतेसाठी आदर्श जीवन आहे. त्याच्या विचारांतून मानवाला जीवन जगण्याची दिशा, प्रेम भावना, सहिष्णुता, आणि सद् ? चारित्र्याची प्रेरणा मिळते. संतांचे विचार मोठ्या प्रमाणात प्रसारित झाले पाहिजे.

अखंड हरिनाम सप्ताहातुन संत विचाराची उधळण होते.

मानव धर्म उन्नतीसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळते. संतांचे विचार प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे



### मांडवजाळी येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता

जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड तालुक्यातील मांडव जाळी येथील हभप शहादेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनातील अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांना केले.

हभप शहादेव महाराज शास्त्री यांनी मांडवजाळी परिसरात सुरू केलेले अध्यात्माचे कार्य प्रेरणादायी आहे. अध्यात्मा बरोबरच परिसरातील लोकांना मार्गदर्शन, व्यसनमुक्तीचा संदेश, लोकांना बरोबर घेऊन विकास कामांसाठी त्यांचे प्रयत्न चालू असतात. त्यांच्यामुळेच येथे सार्वजनिक सभामंडप बांधून देण्याची सेवा माझ्या हातून घडली. प्रत्येक गाव खेड्यात अध्यात्म आणि विकास बरोबरीने चालला तर नक्कीच तेथील ग्राम जीवन समृद्ध होईल. असा विश्वास व्यक्त केला.हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी मांडवजाळी व परिसरातील महिला पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

## वेदिका केकान जिल्ह्यात द्वितीय

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूल ची विद्यार्थिनी वेदिका दादाहरी केकान हिने जानेवारीमध्ये आय.एम. विनर राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. तिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



पिंपळनेर येथील व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी वेदिका केकान हिने जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेत सहभाग घेतला होता. अतिशय हुशार असलेल्या या विद्यार्थ्यीने या परीक्षेत जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. याच शाळेची आर्या मनोज तेहरे ही एप्रिल २०२३ मध्ये जिल्ह्यातून प्रथम आली होती. विद्यालयाची हीच यशाची परंपरा वेदिका केकाण हिने यावर्षी कायम ठेवली आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव भगवानराव जाधव, संस्थाध्यक्ष प्रा.सुरेश सावंत, उपाध्यक्ष डॉ. गणेश नरवडे, प्राचार्य राम कांबळे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी दत्ता तोगे, उदय खरात, मुकुंद आबूज, टीटु नायक, सुरेखा यादव, सगुना डोरले, श्रद्धा नागेश, दिव्या लोळगे, ज्योती राऊत, शेख लजीना, अमोल ठोकरे सह पालकांनी अभिनंदन केले.

## सुशीत ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा उत्साहात समारोप

### श्री क्षेत्र नारायणगडाचे महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन

गेवराई । गेवराई

तालुक्यातील सुशी (व) येथे ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचा श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने समारोप झाला. याप्रसंगी महंत शिवाजी महाराज व श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांची रथातून भव्य मिरवणूक काढून फुलांची उधळण करत स्वागत दिंडी काढण्यात आली यामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण होवून गोकुळ अवतरल्याची अनुभूती आली. यावेळी पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाने सुशी (व) येथे वै.महादेव महाराज यांच्या आशीर्वादाने प्रारंभ झालेल्या ३८ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची रविवार दि.२७ एप्रिल रोजी महंत शिवाजी महाराज यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने भक्तिमय वातावरणात समारोप होवून



सांगता झाली. यावेळी ह.भ.प.दत्ता महाराज गिरी, विशाल महाराज कारंडे, डिंगाबर देवा कुलकर्णी , ह.भ.प.गणपत महाराज उबाळे, विनायक उबाळे, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच टाळकरी, वारकरी, मृदंगाचार्य, गायणाचार्य भालदार, चोपदार , विणेकरी व सुशी पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कीर्तनानंतर श्रीधर एकनाथ पौळ, मच्छिंद्र वाघूजी पौळ यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले तर सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ मंडळी, भजनी मंडळ तसेच सुशी येथील तरुण मंडळी व सप्ताह कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**श्रीक्षेत्र नारायणगड चा २०३८ चा नारळी सप्ताह करण्याचा सुशीकरांचा निर्धार**

सुशी (व) येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात श्री क्षेत्र नारायण गडाच्या नारळी सप्ताहाचे नारळ द्यावे अशी मागणी महंत शिवाजी बाबांकडे ग्रामस्थांनी केली या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपेने सुशी येथे २०३८ वा नारळी सप्ताह करण्याचा शब्द गडाचे महंत शिवाजी बाबांकडून देण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी शिवाजी बाबांचे आभार व्यक्त करुन २०३८ चा भव्य नारळी सप्ताह मोठ्या थाटामाटात करण्याचा एकमुखी निर्धार केला.

पान ६ वरून...

### आता प्रगत समाजाने अप्रगत

डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून गावकुसाबाहेरची वंचित, उपेक्षित, गुलाम माणसं सामाजिक प्रवाहात आणली आणि त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या संपन्न केले. जे आता संपन्न झाले आहेत, समृध्द झाले आहेत, त्यांनी आता मागे पडलेल्या समाज बांधवांकडे पाहायला शिकले पाहिजे आणि त्यांच्याही जीवनात परिवर्तनाचे नंदनवन फुलवले पाहिजे असे आवाहन केले. वारसा हा जन्माचा किंवा रक्ताचा असण्यापेक्षा वारसा हा विचारांचा असला पाहिजे हे आपल्याला महापुरूषांची जीवनचरित्रं सांगतात. त्या पद्धतीने प्रत्येकाने जगायला शिकलं पाहिजे असे मत सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. यावेळी आयोजित आरोग्य शिबिरात उपस्थित वरील तज्ज्ञ डॉक्टर्सनी उपस्थित सर्व रूग्णांना तपासून त्यांच्यावर योग्य उपचार केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी किशोर गोरे व उमेश गोरे यांनी पुढाकार घेतला होता.

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर

व सर्व सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ यांच्या वतीने मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख सुरेश करांडे व त्यांचे संपूर्ण शिक्षक सहकारी शेळके सर, सोळंके सर, बडदे मॅडम, थिटे मॅडम, शेंडगे मॅडम, सौंदरमल मॅडम या सर्वांचा यथोचित असा सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बब्रुवान जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करुन शाळेला वारंवार सहकार्य करण्याचे आपली भूमिका असल्याचे जाहीर केले व त्यासाठी ग्रामस्थांचे व ग्रामपंचायतीचे सहकार्य घेतले जाईल असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती.थिटे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती.बडदे मॅडम यांनी केले.

### सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी

जपतानाच भाविकांच्या, शिष्यांच्या शरिराच्या आरोग्याची माहिती होण्यासाठी प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

वीरशैव लिंगायत समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये श्री सद्गुरु मिस्किन स्वामी यांचा जयंती रविवारी विविध धर्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळी आठ वाजता रजत पालखी सोहळा काढण्यात आला. यामध्ये श्री मिस्किन स्वामी यांची चांदीची मूर्ती पालखीमध्ये ठेवून रजत पालखी मठ, देवी मंदिर ते सिंदफणा नदीपर्यंत काढण्यात आली. नदीपात्रात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत चांदीच्या मुर्तीला जलाभिषेक घालण्यात आला. पालखीत सहभागी महिलांनी नदीतील जल कलशात घेऊन रजत पालखी नदीपात्र ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान मंदिर मार्गे माजलगावकर मठात रजत पालखीचा समारोप झाला. यानंतर नदीपात्रातील जलाने श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या समाधीस लघुरुद्राभिषक घालण्यात आला. यानंतर श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशीवर्चन लाभले. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या जन्मोत्सवानिमित्त यंदा माजलगावकर मठात रक्तदान व नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले. शेवटी भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास माजलगावसह बीड, गेवराई, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी जयंती उत्सवासाठी माजलगाव येथील वीरशैव समाज तसेच युवकांनी मोठे परिश्रम घेतले.

मठातर्फे वर्षभर आरोग्य शिबिरे घेणार

आरोग्य हा विषय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. माजलगाव मठातर्फे भविष्यकाळात आरोग्य विषयक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. वर्षभर आरोग्य शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यावर मठाचा भर असेल, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

### अंबानगरीत श्री गजानन

पहाटे ५ वा श्रींना रुद्राभिषेक व आरती सकाळी श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण,सांप्रदायी भजण,भक्ती संगीत,कु. दिपाली रघुनाथराव कुलकर्णी परतुर, प्रसाद महाराज कुलकर्णी जवळबनकर यांचे किर्तन होणार आहे.९ मे रोजी गण गण गणात बोतेच्या गजरात टाळमृंदगाचा टेकाधरत धाकटे देवघर,कुत्तर विहर, पाटील चौक, जयवंती पुल, साई गणेश मंदीर, खोलेश्वर मंदीर, चौभारा गल्ली, गौंड गल्ली मार्गे धाकटे देवघर येथे पालखी पोहचणार आहे.१० मे रोजी शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर महाआरती व महाप्रसाद,सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ संचलित, सत्संग श्री गजाननाचा व ''श्रींची'' दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता उत्सहात करण्यत येणार आहे.पारायाण सोहळा, विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादाचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहान संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

cmyk

# द्राक्षांच्या शहरात हापूसची गोडी; क्विंटलमागे तब्बल १६ ते २० हजाराचा मिळतोय दर

कांदा आणि द्राक्षांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्याला सध्या हापूसची चांगलीच गोडी लागलीय . गेल्या काही दिवसांपासून नाशिकमध्ये हापूसला चांगला भाव मिळतोय . क्विंटल मागे १६००० ते २० हजार पर्यंत भाव मिळत असल्याने आंबा उत्पादक शेतकरी सुखावले आहेत . शनिवारी बाजारसमितीमध्ये ६७१ क्विंटल हापूस आंब्याची आवक झाली .गेल्या चार ते पाच दिवसांपासून नाशिकमध्ये हायब्रीड लोकल तसेच हापूस आंब्याची मोठी आवक होतेय .मुंबईच्या फळ बाजारात हापूसला राज्यातील सर्वाधिक भाव मिळत आहे .क्विंटल मागे ३० ते ४० हजारांचा भाव मिळत आहे.

नाशिकमध्ये कांदा आणि द्राक्ष या दोन पिकांनंतर आता आंब्यालाही उत्पादनासाठी पसंती दिली जात आहे .केशर बदाम या आंब्याचे पीक घेण्याचे प्रमाण जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून वाढले आहे . कळवन सिन्नर दिंडोरी तालुक्यात नाशिकमधील सर्वाधिक आंबा लागवड केली जाते . सध्या नाशिकच्या बाजार समितीत हापूस आंब्याला क्विंटल मार्गे चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी मालामाल होत आहेत . दरम्यान, किरकोळ बाजारात हापूस सध्या ८००-१००० रुपये डझनने विकला जात आहे.



उर्वरित राज्यात आंबा मार्केट कसे?

राज्यभरात सध्या आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून २१ ते २४ हजार क्विंटल पर्यंत राज्यभर वेगवेगळ्या जातींचा आंबा येत आहे . हापूस तोतापुरी लोकल हायब्रीड तसेच पायरी मद्रास अशा कितीतरी आंब्यांनी राज्यभरातील फळबाजार दरवळला आहे .पुण्यात सध्या लोकल आंब्याला क्विंटल मागे ११५०० ते १५००० पर्यंत भाव मिळतोय . अहिल्यानगरमध्ये ११००० ते १४००० पर्यंत दर आहेत .नागपूर सांगली या जिल्ह्यांमधून तोतापुरी आंबा सर्वाधिक येत आहे .या आंब्याला साडेतीन ते पाच हजाराचा भाव मिळतोय .

### दोन दिवसांपूर्वी राज्यातील आंब्याचे बाजारभाव असे...

| | | | |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर | | ३० | ११००० |
| धाराशिव | लोकल | १० | ६५०० |
| जळगाव | लोकल | ५० | ४५०० |
| जळगाव | मद्रास | ७० | ४५०० |
| मंबई | लोकल | ६८७१ | १०००० |
| मंबई | हापूस | ९३३५ | ३०००० |
| नागपूर | लोकल | २७७३ | ३४३८ |
| नागपूर | तोतापुरी | ३००० | ३७५० |
| नाशिक | हायब्रीड | ११५० | १६००० |
| पुणे | लोकल | ४० | ९००० |
| सांगली | हापूस | ६३८ | १०२५० |
| सांगली | तोतापुरी | ८२ | ३२५० |
| सोलापूर | लोकल | १२१ | ३५०० |
| सोलापूर | लोकल | १४० | १००० |
| सोलापूर | हापूस | ३३७ | २००० |
| एकुण आवक | | २४१७० | |

# पावसामुळे डागाळलेल्या आंब्याचे असे करा व्यवस्थापन!



सध्या महाराष्ट्रात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे, त्यामुळे आर्द्रतेमध्ये वाढ झाली आहे. फळांचा राजा आंब्याचा मोसम सुरू असताना या पावसामुळे आंब्याच्या फळांवर डाग पडत आहेत. करपा रोगामुळे आंब्याच्या फळांवर काळे डाग पडत आहेत. तसेच देठकूज या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता देखील आहे.

अशा परिस्थितीत आंबा टिकण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करणे उपयुक्त होईल. यासाठी काही विशेष उपाय करने गरजेचे आहे.

अशी घ्या काळजी : शेतकऱ्यांनी अझॉक्सीस्ट्रॉबिन या बुरशीनाशकाची २३.५ ई.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात स्टिकर मिसळून फवारणी करावी. आर्द्रतेमध्ये वाढ झाल्यामुळे २ फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यासाठी हेक्टरी ४ नग रक्षक सापळे वेगवेगळ्या ठिकाणी झाडांच्या खालील बाजूंच्या फांद्यावर लावावेत.

फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावीत आणि बागेत स्वच्छता ठेवावी. तयार झालेली आंबा फळे काढताना सकाळी १० वाजेपर्यंत व सायंकाळी ४ नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने काढणी करावी. काढणी पश्चात बुरशीजन्य रोगांपासून बचाव करण्यासाठी काढलेली फळे लगेचच ५० अंश सेल्सिअस पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर सावलीत वाळवावीत. तसेच फळांची वाहतूक करताना रात्रीच्या वेळीस करावी.

# हायड्रोपोनिक पद्धतीने स्ट्रॉबेरी लागवड

शेती करत असताना माती आणि पाणी नसेल तर शेतीमध्ये पिके मिळवण्याबाबत कल्पनाच केली जाऊ शकत नाही. मात्र, शेतीमध्ये सध्या नवनवीन तंत्रज्ञानाचा शिरकाव होत असून, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळवणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे शेतकरी हायड्रोनिक्स या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, विना मातीचे मोठी कमाई करत आहे. एका शेतकऱ्याने हायड्रोनिक्स तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करत, स्ट्रॉबेरी पिकाचे उत्पादन घेतले आहे. ज्यातून त्याला लाखो रुपयांची कमाई झाली आहे.

धीरज वर्मा असे या शेतकऱ्याचे नाव असून, तो उत्तर प्रदेशमधील बाराबंकी जिल्ह्यातील रहिवासी आहे. धीरज वर्मा हा बीएस्ससी पदवीधर असून, त्याने शिक्षणानंतर नोकरीच्या मागे न लागता शेतीची वाट धरली. त्यासाठी त्याने पॉलीहाऊस उभारून हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्याचा निर्धार केला. यासाठी त्याने महाराष्ट्रातील महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणी येणाऱ्या स्ट्रॉबेरी या पिकाची निवड केली. विशेष म्हणजे विना माती आणि अगदीच कमी पाण्यात त्याने स्ट्रॉबेरीचे हे उत्पादन घेतले आहे.

हायड्रोपोनिक प्रकारची शेती ही इस्राएलमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. या पद्धतीमध्ये केवळ पाण्यावर पिके घेतली जातात. शेतकरी धीरज वर्मा यांनी हीच हायड्रोपोनिक पद्धत वापरून स्ट्रॉबेरीची रोपे लावली आहेत. साधारणपणे त्यांना एका हंगामामध्ये धीरज वर्मा यांनी पाच टन स्ट्रॉबेरीचे उत्पादन काढले आहे. याच स्ट्रॉबेरीच्या उत्पादनातून त्यांना आतापर्यंत एकूण तीन लाख रुपयांचा नफा देखील झाला आहे. सध्या त्यांच्या स्ट्रॉबेरी पिकाची काढणी सुरु असून, त्यांना त्यातून आणखी नफा मिळणार असल्याचे ते सांगतात.

महाराष्ट्राच्या मातीतील पीक

स्ट्रॉबेरी हे एक बेरी वर्गीय फळ आहे. हे एक लहान आकाराचे फळ असून लाल रंगाचे फळ आहे. ते थंड प्रदेशात होते. सुगंध, लाल रंग, रसाळपणा आणि गोडपणा यामुळे हे फळ प्रसिद्ध आहे. स्ट्रॉबेरीमध्ये कर्बोहायड्रेटस जीवनसत्त्व ‘क’ , ‘ब’ आणि कॅल्शियम, लोह, स्फुरद इत्यादी घटक भरपूर प्रमाणात असतात. साधारणपणे महाराष्ट्रातील महाबळेश्वर स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.



# जमिनीच्या पोषणासाठी संतुलित अन्नद्रव्य महत्वाचे

जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण पीक पोषणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असते. जमिनीत एकूण अन्नद्रव्य जास्त प्रमाणात असेल तरी ही अन्नद्रव्ये पिकांची मुळे शोषून घेऊ शकतील अशा स्वरूपात असणे गरजेचे असते. याशिवाय हवामान, जमिनीचा प्रकार, पीक पद्धती अशा निरनिराळ्या घटकांमुळे या प्रमाणावर परिणाम होत असतो आणि ते प्रमाण सतत बदलत असते. म्हणूनच माती परिक्षणाच्या आधारे हे प्रमाण जाणून घेणे महत्त्वाचे आहे. माती परीक्षण अहवालानुसार पिकांची गरज लक्षात घेऊन खतांची शिफारशी केल्या जातात. रासायनिक खते, सेंद्रिय खते, हिरवळीची पिके आणि जिवाणू संवर्धकांचा एकात्मिक वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून पीक उत्पादन वाढविता येते. माती परीक्षण अहवालामध्ये सामू,क्षारता,मुक्त चुन्याचे प्रमाण, उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, लोह, जस्त, तांबे, बोरॉन व मँगेनीज इत्यादीचे प्रमाण नमूद केलेले असते.



सामू : सामू हा सर्वसाधारण प्रमाणे ६.५ ते ७.५ पर्यंत असावा कारण या दरम्यानच वनस्पतींना लागणारी बहुतेक अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील जमिनीचा सामू किंचित विम्ल ते अतिशय विम्ल (सामू ७.५ ते ९) प्रकारचा आहे. सामू ८.५ पेक्षा जास्त असलेल्या अतिविम्ल चोपण जमिनीमध्ये भूसुधारक म्हणून जिप्समचा शेणखतातून वापर करावा. चुनखडीयुक्त चोपण जमिनीची सुधारणा करताना जिप्सम ऐवजी गंधकाचा शेणखतातून वापर करावा. सामू ६.५ पेक्षा कमी असल्यास त्याला आम्ल जमिनी म्हणतात. विशेषतः कोकणातील जमिनीचा सामू जास्त आम्लयुक्त असतो.अशा जमिनी सुधारण्यासाठी चुन्याचा शेणखतातून वापर करावा.

क्षारता : ६.० पेक्षा कमी आम्लयुक्त जमीन, ६ ते ८ सर्वसाधारण जमीन, ८ ते ९ विम्ल होण्याच्या मार्गावर आणि ९ पेशा जास्त विम्लयुक्त जमीन.

क्षारांचे प्रमाण प्रयोगशाळेत इलेट्रिकल कंडक्टिव्हिटी या उपकरणाद्वारे मोजले जाते. मातीतील विद्युत वाहकता (क्षारता) १.०० डेसी. सी./ मीटर पेक्षा जास्त असेल तर क्षारयुक्त जमीन म्हणतात. अशा जमिनीच्या पृष्ठभागावर विरघळलेल्या क्षारांचा पांढरा थर दिसून येतो. मातीची क्षारता सर्वसाधारपणे ०.१० ते ०.९० डेसी सी/ मीटर या दरम्यानच असावी.त्यापेक्षा जास्त असल्यास चर खोदून जमिनीस निचऱ्याची व्यवस्था करावी. जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर करावा. हिरवळीची पिके जमिनीत गाडावीत. चांगल्या प्रतीचे पाणी सिंचनास वापरून अतिरिक्त क्षारांचा निचरा करावा. चांगल्या प्रतीच्या पाण्याची क्षारता ०.५ डेसी सी/ मीटर पेक्षा कमी असते. ही क्षारता २.५डेसी.सी./मीटर पेक्षा जास्त असल्यास असे पाणी सिंचनास अयोग्य समजले जाते. पाण्याची क्षारता ३.१५ डेसी सी/ मीटर पेक्षा जास्त असल्यास ठिबकसाठी अयोग्य समजले जाते.

सेंद्रिय कर्ब : १.०० पर्यंत सर्वसाधारण, १.०१ ते २.०० पीक व उगवणीस नुकसानकारक,

२.०१ ते ३.०० क्षार संवेदनशील, पिकांच्या वाढीस नुकसानकारक. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जेवढे जास्त तेवढे ते पीक उत्पादन आणि जमिनीच्या भौतिक गुणधर्माच्या संवर्धनाच्या दृष्टीने चांगले असते. सेंद्रिय कर्बाची टक्केवारी शोधल्यास जमिनीतील एकूण नत्राच्या प्रमाणाचाही अंदाज लागतो. सर्व वनस्पती, प्राणी आणि जिवाणूंचे कुजलेले आणि कुजलेले जमिनीतील अवशेष म्हणजेच सेंद्रिय द्रव्य होय. जमिनीतील एकूण सेंद्रिय द्रव्यामध्ये वनस्पतीचे अवशेष जास्त आढळतात. सेंद्रिय द्रव्यात जवळपास ५८ टक्के कार्बन असतो. सेंद्रिय द्रव्य वनस्पतीच्या वाढीसाठी लागणाऱ्या आवश्यक मूलद्रव्याच्या साठवणीचे केंद्र असल्यामुळे जमिनीच्या उत्पादकतेचा निर्देशांक आहे. सेंद्रिय द्रव्य धन आयन विनिमय क्षमता वाढविण्यासाठी, जमिनीची योग्य रचना राहण्यासाठी, जमिनीत ओलावा आणि हवेचे सुयोग्य प्रमाण राखण्यासाठी उपयुक्त असते. जमिनीत मिसळलेल्या सेंद्रिय द्रव्याचे सूक्ष्म जिवांमुळे सतत विघटन होत असते.जमिनीमधील सेंद्रिय कर्बाची सर्वसाधारण मर्यादा ०.४० ते०.६० टक्के योग्य मानली जाते. अशा जमिनीचे जैविक, भौतिक व रासायनिक गुणधर्म चांगले असतात. या जमिनीत पिकांची पोषण क्षमता योग्य असते. जमीन निरोगी राहण्यास मदत होते. त्यामुळे शेतीमध्ये शेणखत, कंपोस्ट व इतर सेंद्रिय पदार्थांचा वापर फायदेशीर असतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : मुघल सम्राट शाहजहान यांनी दिल्ली येथील लाल किल्ल्याचे निर्माण करण्यास पाया रचला.
१८१३ : अमेरिकन वैज्ञानिक जेएफ हम्मेल यांनी रबराचे नमुने सादर केले.
१९३० : ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया देशांतर्गत दूरध्वनी (टेलीफोन) सेवा सुरु करण्यात आली.
१९३३ : 'प्रभात'चा 'सिंहगड' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९३९ : साली स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामधून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध इटलीतील जर्मन सैन्याने दोस्त राष्ट्रांपुढे बिनशर्त शरणागती पत्करली.
१९८६ : लॉस एंजेल्स सेंट्रल लायब्ररीतील आग लागल्यामुळे सुमारे ४,००,००० पुस्तक नष्ट झाले.
१९९१ : बांगलादेशच्या दक्षिण भागातील चितगाव जिल्ह्यात आलेल्या एका भीषण चक्रीवादळाने सुमारे १,३८,००० लोकांचा बळी घेतला तर सुमारे १ कोटि लोक बेघर झाले.
२००७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने श्रीलंकन क्रिकेट संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा विश्वकप जिंकला.
२०११ : ब्रिटीश राजकुमार प्रिंस विलियम आणि केट मिडलटन यांचा विवाह पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रताप यांचे मित्र, सहकारी आणि विश्वासपात्र सल्लागार भामाशाह यांचा जन्मदिन.
१७२७ : फ्रेंच नर्तक आणि बॅलेट चे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्हर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १८१०)
१८४८ : राजा रविवर्मा चित्रकार (मृत्यू: २ आक्टोबर १९०६)
१८६७ : डॉ. शंकर आबाजी भिसे भारताचे ‘एडिसन’ (मृत्यू: ७ एप्रिल १९३५)
१८९१ : भारतीय कवी आणि कार्यकर्ते भारतीदासन यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९६४)
१९०१ : मिचेनोमिया हिरोहितो दुसर्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (मृत्यू: ७ जानेवारी १९८९)
१९१९ : साली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विशेष कौशल्य मिळविणारे प्रख्यात भारतीय तबला वादक अल्ला रखा उर्फ अल्लारखा कुरेशी यांचा जन्मदिन.
१९५८ : पद्मभूषण व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ तसचं, द टेलीग्राफ, हिंदुस्तान टाईम्स आणि हिंदी दैनिक वृत्तपत्र अमर उजाला यांचे स्तंभलेखक रामचंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९३६ : झुबिन मेहता भारतीय संगीतकार
१९६६ : फिल टफनेल इंग्लिश फिरकी गोलंदाज
१९७० : आंद्रे आगासी अमेरिकन लॉनटेनिस खेळाडू
१९७९ : प्रसिद्ध भारतीय सेवानिवृत्त क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज आशिष नेहरा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे प्रभावी संस्थापक व दिल्लीच्या गादीवर राज्य करणारे पहिले मुस्लीम शासक शम्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१९४५ : हाइनरिक हिमलर जर्मन नाझी अधिकारी (जन्म: ७ आक्टोबर १९००)
१९५८ : भारताच्या उडीसा राज्यातील प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व गांधीवादी कार्यकर्ता गोपबंधू चौधरी यांचे निधन.
१९६० : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (जन्म: ८ डिसेंबर १८९७)
१९७९ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, लेखक, क्रांतिकारक व समाजसुधारक राजा महेंद्र प्रताप यांचे निधन.
१९८० : श्रीकृष्ण के. क्षीरसागर लेखक, विचारवंत, समीक्षक (जन्म: ६ नोव्हेंबर १९०१)
१९८० : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १८९९)
१९९७ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सतरावे गव्हर्नर व भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य आर.एन.मल्होत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आणि हिंदी चित्रपटांचे गीतकार केदार शर्मा यांचे निधन.
२००६ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: १५ आक्टोबर १९०८)
२०१० : गायत्री मंडळाच्या संस्थापिका व सदस्या तसचं, समाजसेविका कमलादेवी शुक्ला यांचे निधन.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने करा बांबूची शेती

बांबूची शेती ही महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा एक टिकाऊ स्रोत बनू शकते. जलद वाढणारी आणि बहुउपयोगी असलेली ही वनस्पती आपल्या राज्याच्या विविध हवामानात चांगली येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांबूची शेती केल्यास चांगला फायदा होतो. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे येणारे मांजरी (डेंड्रोक्लॅमस स्ट्रिक्टस), कांटेरी बाँबू (बांबुसा बांबोस), मंगा (डेंड्रोक्लॅमस स्टॉक्सी) आणि चिंच (मुनरोचलोआ रिचीई) हे बांबू चांगले येतात. तुमच्या जमिनीच्या हवामानानुसार जातीची निवड करा. बियाण्यांपासून रोपे तयार करण्यासाठी रोपवाटिका तयार करा. चांगल्या मिश्रित मातीमध्ये बियाणे पेरा आणि त्यांची काळजी घ्या. ऑनलाइन मृदा चाचणी करून तुमच्या जमिनीची पोषकद्रव्ये तपासा. त्यानुसार खतांचा वापर करा. तुमच्या जमिनीच्या आकाराच्या आधारे रोपांची संख्या ठरवा.

रोपण आणि देखभाल : तुमच्या शेताचे नकाशा तयार करण्यासाठी जिपीएसचा वापर करा. यामुळे रोपांमधील अंतर आणि रांगा एकसार ठेवणे सोपे होईल. मोठ्या क्षेत्रात रोपांची लागवड करण्यासाठी तुम्ही स्वस्त ड्रोनचा वापर करू शकता. यामुळे वेळ आणि पैसा वाचतो. हवामान अंदाजाच्या ॲप्सचा वापर करून पाण्याचा योग्य नियोजन करा. हे तुमच्या बांबूच्या चांगल्या वाढीसाठी मदत करेल. किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जैविक किटकनाशकांचा वापर करा. हे तुमच्या बांबूच्या गुणवत्तेसाठी आणि पर्यावरणाची चांगली राखण करण्यासाठी फायदेशीर आहे.

कापणी आणि विक्री : तुमच्या बांबूची वाढ मॉनिटर करण्यासाठी उपग्रह प्रतिमांचा वापर करा. यामुळे योग्य वेळी कापणीची तयारी करता येते. तुमच्या बांबूची विक्री करण्यासाठी कृषी उत्पादनांच्या ऑनलाइन बाजारपेठांचा फायदा घ्या. हे व्यापारी आणि शेतकऱ्यांना जोडणारे असून चांगला दर मिळवून देते. महाराष्ट्र सरकार बांबूच्या लागवडीवर अनुदान देते. या योजनांची माहिती कृषी विभागाच्या कार्यालयाकडून मिळवा.

# लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या वादात बीड पंचायत समितीतील शेतकऱ्यांची कामे खोळंबली

## कार्यालयात खुर्चीवर उपस्थित न राहणाऱ्या आधिकाऱ्याच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी संगीत खुर्ची आंदोलन





बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीत लोकप्रतिनिधी आणि आधिका-यांच्या अंतर्गत वादात घरकुल,फळबागा,गायगोठा, शेवगा लागवड,खडीकरण, पाणंद रस्ते आदी कामांची मागणी, मंजुरी तसेच मस्टर काढणे बंद, बिले काढण्यात येत नाहीत त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. गटविकास अधिकारी कार्यालयात खुर्चीवर हजर रहात नसल्याने आणि दर सहा महिन्यांनी अधिकारी बदलत असल्याने बीड पंचायत समितीमध्ये संगीत खुर्चीचा खेळ रंगला असुन यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी बीड पंचायत समिती आवारात लक्ष्यवेधी संगीत खुर्ची आंदोलन करण्यात आले.निवेदन जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितजी पवार, रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक) रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सादेक सय्यद, कोषाध्यक्ष आप कैलासचंद पालेवाल, प्रसिद्धी प्रमुख रामभाऊ शेरकर आदी सहभागी होते.

बीड जिल्ह्यात एकूण ७३५७ कामांवर ८८,७२४ मजूर असून बीड पंचायत समिती अंतर्गत केवळ ५० कामे सुरू असुन त्यावर २१७ मजूर आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातील एकंदरीतच सर्व तालुक्यांमध्ये बीड पंचायत समितीमध्ये कमी कामे सुरू असून शेतकऱ्यांच्या कामांची मागणी व कामांना मंजुरी देण्यासाठी अधिकारी यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असून यामुळे शेतकऱ्यांची अडवणूक होत आहे. शेतकऱ्यांच्या कामांची मागणी मंजुरी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. ४३ डिग्री तापमानात रोहयो कामांवर ८८ हजारांहून अधिक मजुर दाखवणे संशयास्पद असून सखोल चौकशी करून कारवाई करा बीड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना भ्रष्टाचाराचे कुरण झाले असून नेत्यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी मागच्या सरकारच्या काळात कुशल, अकुशलचे निकष धाब्यावर बसवून थेट मंत्रालयातून मोठ्या मोठ्या प्रमाणावर कामांना मंजुरी देण्यात आली. यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाली .नरेगाच्या अहवालानुसार आज घडीला जिल्ह्यात नरेगाची ७३५७ कामे सुरू असून त्यावर ८८,७२४ मजूर काम करत असल्याचे दाखवले आहे. सध्या बीड जिल्ह्याचे तापमान ४३ अंश असून दिवसेंदिवस उच्चांक पातळी गाठत असताना घराच्या बाहेर पडणं मुश्किल असताना आणि उष्माघाताच्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन केले जात असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी योजनेवर काम करण्याची वेळ असेल आली असेल तर मजुरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे नरेगाच्या कामावर खरोखरच इतक्या मोठ्या प्रमाणात मजूर आहेत का? ८८ हजार मजुरांचा आकडा नेमका दुष्काळाचा कर आहे की बोगसगिरीचा कहर आहे याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.



# पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात...!

## लवकरच वाहतुकीसाठी पुल खुला होणार- राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल मधील पिंपळवाडी ते भाळवणी रस्त्यावर बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सामान्य जनतेला वाहतुकीसाठी हा पुल पुढील काही दिवसात खुला होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी दिली आहे.

पिंपळवाडी, भाळवणी डोंगरी पट्ट्याचा परिसर.या परिसरातील शेतकरी शेतीसह दूध, दही, भाजीपाला शेती पुरक व्यवसाय करतात. रोज बीड शहरात दुध दही विकण्यासाठी येतात. डोक्याचावाडा साठवण तलावाखाली बिंदुसरा नदीचे पात्र रुंद असल्यामुळे पावसाळ्यात शाळेतील मुले, दुग्ध व्यवसायीक शेतकरी, सर्वसामान्य माणूस यांना रहदारीला अडचण होते. पुरसदृश्य परिस्थितीत पिंपळवाडी व परिसरातील गाव खेड्यांचा पुला अभावी संपर्क तुटतो.यामुळे जनतेचे हाल होतात. पुला अभावी पावसाळ्यात होणारी अडचण लक्षात घेऊन,अनेक वर्षापासून या पुलाची मागणी ग्रामस्थ करत होते. लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र मस्के यांच्याकडे डोंगरपट्ट्यातील नागरिकांनी पुलाची मागणी केली होती. डोंगरपट्ट्यातील गाव खेड्यांना जोडणारा हा महत्वपूर्ण पुल मंजूर करण्यासाठी शासन प्रशासन स्तरावर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा पुल मंजूर करून घेतला.

प्रलंबित विकास कामाला गती मिळाली.या पुलामुळे भविष्यात वाहतूकी साठी अडचण निर्माण होणार नाही.या पुलाचे काम आज अंतिम टप्प्यात असून येणाऱ्या काही दिवसात आठ ते दहा गावांना सुलभतेने जोडणारा हा पूल जनतेसाठी खुला होणार आहे. आगामी काळात या भागातील विकास कामांना प्राधान्य देवून जनतेचे हित साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहाणार आहोत.असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी दिला आहे.

# हस्सान अन्सारी तालुक्यातून शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम

## मदरश्याचा विद्यार्थी मराठी- इंग्रजी बोलू लागला- सज्जाद सय्यद



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा या मदरश्यातील विद्यार्थी व जामखेडच्या ताज मस्जिद चे धर्मगुरू कारी मुबीन अन्सारी यांचे चिरंजीव हस्सान अन्सारी याने सन २०२३ -२०२४ नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जामखेड तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल मदरसा पाटोदा येथे त्याचा भव्य सत्कार करण्यात आला. सन २०२३ - २४ मध्ये वर्ग ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत जामखेड तालुक्यातून प्रथम आलेला हस्सान अन्सारी याचा सत्कार करण्यात आला यावेळी सेवा सोसायटीचे संचालक सज्जाद सय्यद, अँड जब्बार पठाण अँड सय्यद वहाब सय्यद, सरफराज ,मौलाना पठाण अक्रम, हाजी सय्यद मजहर, पठाण बरकतखान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . या सत्कार साठी हस्सान चे वडील कारी मुबीन अन्सारी उपस्तीत होते.मौलाना पठाण अक्रम यांनी आपल्या भाषणात हस्सान अन्सारीच्या यशाचे कौतुक केले. आणि इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

सेवा सोसायटीचे संचालक , सामाजिक कार्यकर्ते सय्यद सज्जाद यांनी बोलतांना सांगितले की,मदरशा मध्ये मराठी, इंग्रजी, गणित विषयाचे चांगले शिक्षण दिले जाते.सातत्याने परिश्रम केल्यास कोणतीही मोठी कामगिरी शक्य आहे. अँड जब्बार पठाण यांनी सांगितले की, मुलांनी स्पर्धा परीक्षा च्या अभ्यास केला पाहिजे .त्या साठी लगणारे पुस्तक उपलब्ध करून देऊ व मदरसा मध्ये जे सहकार्य लागेल ते आम्ही करू असे सांगितले, अँड. सय्यद वहाब यांनी बोलतांना सांगितले, मुलांना धार्मिक शिक्षण बरोबर आधुनीक शिक्षण देखील गरजेचे आहे. मुलांनी चांगला अभ्यास केला पाहिजे या ठिकाणी जे सहकार्य लागेल ते आम्ही नक्कीच करू असे सांगितले. मुफ्ती जफर साहब यांनी पाटोदा मदरसा मध्ये मुलांची तयारी कशी करून घेतली जाते. याची माहिती सांगितली येथील विद्यार्थी मोठ्या पदावर जातील. अशी मला आशा आहे. तसेच हस्सान ला इंग्रजी विषयाचे शिक्षण देणारे सलीम तांबोळी सर यांचे हि सर्वांनी कौतुक केले. या वेळी प्रा. सचिन गायकवाड यांनी हस्सान अन्सारी यांचे कौतुक केले मुलांना मार्गदर्शन केले तसेच प्रमुख पाहुणे यांनी या ठिकाणी सर्व शिक्षकांचे मेहनतीचे कौतुक केले. यावेळी उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या गजरात हस्सान अन्सारीचे अभिनंदन केले. हस्सानच्या यशामुळे जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा संस्थेचे नाव उंचावले आहे. यावेळी मुफ्ती जफर साहेब मौलाना मोईज . मौलाना मजहर. मौलाना आरबाज.मौलाना जहुर. मराठी विषयाचे शिक्षण देणारे अमजद खान पठाण सर व इंग्रजी गणित विषयाचे शिक्षण देणारे प्रा . सचिन गायकवाड सर अयुब मोमिन अमजद खान पठाण हजर होते.

# वैजाळा सेवा सहकारी संस्था भाऊसाहेब भराटे गटाच्या ताब्यात

## जय हनुमान पॅनेलचा दणदणीत विजय ११ पैकी १० जागांवर बहुमत

पाटोदा

पाटोदा तालुक्यातील प्रतिष्ठेची मानली जाणारी वैजाळा सेवा सहकारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक काल, दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी शांततेत पार पडली. या निवडणुकीत भाऊसाहेब भराटे व पंडितराव येडे गटाच्या जय हनुमान पॅनेलने ११ पैकी १० जागांवर बहुमताने विजय मिळवत संस्थेवर आपली सत्ता कायम राखली.



या निवडणुकीत विजयी झालेले संचालक पुढीलप्रमाणे आहेत: सर्वसाधारण गटातून आश्रुबा आबाराव येडे, रामा येडे, बाळासाहेब येडे, सुंदरराव येडे, संदिपान भराटे, बाबासाहेब मस्कर, महादेव भानुदास खुळे आणि कोंडीबा बाचणे.महिला राखीव गटातून सुनिता शिवाजी कदम आणि संगीता विश्वास येडे यांनी विजय संपादन केला.या निकालामुळे भराटे गटाने संस्थेवर आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जय हनुमान पॅनेलच्या या यशानंतर गटातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.या यशस्वी निवडणुकीबद्दल सर्व विजयी संचालकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, विश्वासाने मतदान करणाऱ्या सर्व मतदार बंधू-भगिनींचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

## डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या स्मरणार्थ पाणपोई

परळी । प्रतिनिधी

शिवभक्त डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या स्मरणार्थ परळी येथील आयडीबीआय बँकेच्या समोर सामान्य नागरिकांची तहान भागवण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या शुभहस्ते संपन्न यावेळी सारड गावचे माजी सरपंच आघाव साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक सामान्य नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कडक उन्हाळ्यामध्ये परळीत येणाऱ्या लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम आणि थंडगार सोय व्हावी म्हणून हा उपक्रम ते दरवर्षी राबवतात. पाणी हे जीवन आहे. पाण्यासाठी लोकांची भटकंती सध्या सुरू आहे परंतु शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील तसेच शहरातील नागरिकांची तहान भागवी हा स्वच्छ उद्देश डोळ्यासमोर ठेवून पानपोईची संकल्पना अँड.मनोज संकाये मित्र मंडळ राबवत आहे. यांच्या या उपक्रमाबाबत सर्वत्र समाधान आणि कौतुक होत आहे. यावेळी मंगलवार मल्टीस्टेट बँकेचे शाखा अधिकारी गजानन हलगे, अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे संदीप चौधरी , शिवा बडे, बालासाहेब चाटे,प्रवीण रोडे, संतोष कांबळे, बाबुराव ठोके, विशाल नरवणे, देविदास मुंडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गौरी कांबळेचे यश

दिंद्रुड। प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी गौरी नवनाथ कांबळे हिने यश संपादन केले असून ती या शिष्यवृत्तीस पात्र झाली आहे.दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील शाळेत इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार नवनाथ कांबळे यांची मुलगी गौरी (प्राची) कांबळे हिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाली आहे.

# आंबेडकरांनी भारतीयांना लोकशाही बहाल केली: पप्पू कागदे



बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारून शोषत, पिडीत उपेक्षीत समाज बांधवांना मुख्य प्रकलत आणण्यासाठी त्याचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून प्रत्येकांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला. हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून उपेक्षीतांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला देवून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी, शिवणी, खांडवी, सांडरवण, घाटजवळा, आहेर वडगांव या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महीलांचे सक्षमीकरण-करण्यासाठी हिंदु कोड बील मंजूर करून त्यांना त्याचे हक्क व अधिकार दिले. आणि अशिक्षीत समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करुन शिक्षणाची दारे खुली केली. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देवून मतदारराजा बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता भारताला संविधान देवून सक्षम लोकशाही बहाल केली. यावेळ पूज्य भिख्कु धम्मशिल थेरो, राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, सुभाष तांगडे, अण्णा भोले, किशोर भोले, शुभम भोले, विजय डोळस, नवनाथ डोळस, विजय सुपेकर, गोरख डोळस, राहुल कांबळे, सुनिल कांबळे, विभीषण जावळे, बंडू घुमरे, सुनिल गायकवाड,प्रमोद गायकवाड यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.


**सायटेशन नोटीस**

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४६२/२०२५**

**लक्ष्मण विरूध्द निरंक**

अर्जदार १. लक्ष्मण पि. दगडु करांडे, वय ६८ वर्षे, धंदा- शेती, रा. कळसंबर, बीड ता.जि. बीड., २. बबन पि. लक्ष्मण करांडे, वय ४२ वर्षे, गंदा शेती, रा. सदर. ३. ज्ञानेश्वर पि. लक्ष्मण करांडे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. सदर ४. राजुबाई भ्र. जगन्नाथ जाधव, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. जैताळवाडी, ता.जि.बीड.

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत प्रयागाबाई भ्र. लक्ष्मण करांडे मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत प्रयागाबाई भ्र. लक्ष्मण करांडे यांचा मृत्यु अनुक्रमे दिनांक ०४/०५/२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत प्रयागाबाई भ्र. लक्ष्मण करांडे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदत्तीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत प्रयागाबाई भ्र. लक्ष्मण करांडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०४/२०२५ आहे.

स्वाक्षरित **क लिपीक** | (शिक्का) | आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

## नाव नोंदणी करण्याचे आवाहन: भिक्खु धम्मशिल थेरो

बीड । प्रतिनिधी

तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पालकांनी आपल्या १५ वर्षावरील मुलांचे नाव नोंदवून



प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

**नाव नोंदणीसाठी संपर्क**

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम त्वरित पूर्ण करा-अँड.मनोज संकाये

## उपजिल्हाधिकारी यांना मित्र मंडळाच्या वतीने निवेदन सादर | अन्यथा राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र दिनी धरणे आंदोलन करण्याचा इशारा!

परळी । प्रतिनिधी

गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आज तागायत पूर्ण झाले नसून याला जबाबदार राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदार आणि अधिकारी हे जबाबदार आहेत याचा फटका प्रवाशांना बसत आहे. वाहतूक कोंडी निर्माण होऊन या मार्गावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे या महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा तसेच परळीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील वळणावरची संरक्षण भिंत त्वरित बांधा या मागणीसाठी मित्र मंडळाच्या वतीने परळी येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी माननीय लाटकर साहेब यांना निवेदन दिले. यात त्यांनी विविध मागण्या केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र दिनी परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावर मित्र मंडळाच्या वतीने धरणे आंदोलन केले जातील असा इशारा त्यांनी दिला.




निवेदनात म्हटले आहे की, परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्ग याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू असून ते आज पर्यंत अपूर्ण आहे. संबंधित गुत्तेदार अतिशय निष्काळजी पणाने या मार्गाचे काम करत आहेत.

औष्णिक विद्युत केंद्राचे जुने भांडार ते धर्मापुरी फाट्यापर्यंत पुलाचे आणि मार्गाचे काम अर्धवट रखडलेले आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होऊन असंख्य अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि याच ठिकाणी अपघात घडले आहेत त्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना स्वतःचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर परळी शहरातील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उडान पुलावरील वळणावर संरक्षण भिंत पडल्याने तेथे दोघांचा मृत्यू झाल्याची घटना गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी घडली आहे याबाबत अधिकाऱ्यांची संपर्क साधला असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. संरक्षण भिंत पडल्याने तीस ते चाळीस फूट वाहन खाली कोसळण्याची दाट शक्यता आहे त्याचबरोबर परळी राष्ट्रीय महामार्गावरील चेंबरी विश्रामगृहा जवळील पुलावरील झाडे झुडपे, मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत त्यामुळे वळणावर समोरचे वाहन दिसत नाही तेथेही अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे तेथील झाडे झुडपे तोडून घ्यावीत त्याच ठिकाणी रोलिंग व कठडे पडल्याने अपघात होत आहेत जवळपास ५० फूट रोलिंग नसल्याने वाहनांना धोका निर्माण झाला आहे. सदरील निवेदनाच्या प्रति नामदार मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, नामदार माननीय माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माननीय जिल्हाधिकारी बीड, माननीय तहसीलदार परळी वैजनाथ आणि माननीय पोलीस निरीक्षक संभाजीनगर यांना मेलद्वारे पाठवल्या आहेत. यावेळी अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे ,दगडू भाले, सुंदर आव्हाड, संदीप चौधरी, गिरीश सलगरे, प्रवीण रोडे ,संतोष कांबळे, देविदास मुंडे, प्रमोद गिरी, राम गडदे ,राम चाटे, अनंत कातकडे, पापा क्षीरसागर, श्रीमंत मुंडे,गिवेश मिसाळ,दिनेश मिसाळ, श्याम जाधव आणि भास्कर नावंदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५ | ६

# आष्टीत दिवसाढवळ्या घातक शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी

## २ लाख रु.चे सोन्याचे दागिने, ६० हजार रोख रक्कम चोरीला; १ आरोपी अटक, २ फरार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील प्रथितयश वैद्यकीय व्यावसायिक डॉ. चंद्रकांत ढेरे यांच्या घरी भर दुपारी ४.३५ वा. चे सुमारास घरात घुसून घरातील एकट्या असलेल्या पत्नीला गावठी पिस्तूल सारखे घातक शस्त्र आणि चाकूचा धाक दाखवून साडीने तोंड, हात, पाय, बांधून गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण, तीन ग्रॅम कानातील रिंग आणि ६० हजार रुपये रोख असा ऐवज चोरीला गेला आहे विशेष म्हणजे यामध्ये घरगडी सामील असल्याचे निष्पन्न झाले आहे एक आरोपी अटक असून त्याचे दोन साथी दार अद्याप फरार आहेत भर दिवसा झालेल्या या घटनेने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत याविषयीचे सविस्तर वृत्त असे की,

रविवार दि.२७ एप्रिल २०२५ रोजी डॉ.चंद्रकांत ढेरे हे दवाखान्यात असताना दुपारी ४.३० वा.चे सुमारास घरी त्यांच्या पत्नी शिक्षिका श्रीमती विद्या ढेरे पाटील या एकट्या असताना त्यांच्याच दवाखान्यामध्ये आणि घरामध्ये घरगडी म्हणून काम करणारा शिवा बावरे हा भाजीपाला बाजाराची पिशवी घेऊन आला, टरबूज मिळाले नाहीत बाकी सर्व भाजीपाला आणला आहे असे म्हणून बाहेर गेला आणि पाच मिनिटांनी दोन टरबूज घेऊन आला त्याचबरोबर त्याच्या मागून दोन अनोळखी इसम घरात आले त्यांनी दार आतून बंद केले चोरट्यांच्या हातात गावठी पिस्तुला सारखे शस्त्र आणि मोठ्या चाकूचा धाक दाखवून घरामध्ये काय काय ठेवलेले आहे ?

ते काढून दे असे म्हणून डॉक्टर पत्नीचे गळ्यातील मिनी गंठण आणि कानातले सोन्याचे सुई दोरा काढून घेतला डॉक्टरांच्या पॅन्टमधील ६० हजार रूपये काढून घेतले

घरांतील कपाटे उचकून काही मिळाले नाही परंतु त्यातील दोन साड्यांनी हात पाय तोंड घट्ट बांधून बेडरूम मध्ये उभे राहण्याची सांगितले सुमारे एक तासभर हे थरार नाट्य सुरू होते मात्र त्यानंतर हे दोन्ही चोरटे घराबाहेर गेले त्यांचे बरोबर घरगडी असलेला शिवा हा बाहेर गेला आणि परत आला आणि म्हणाला मॅडम आता चोर गेले आहेत असे म्हणून त्यांचे बांधलेले हात पाय सोडले या सर्व प्रकाराने डॉक्टर पत्नी या भयभीत झालेल्या दिसून आल्या चोरांना काहीही प्रतिकार न करता शांतपणे बसून राहिलेला घरगडी या घटनेत सामील झाल्याचे दिसून आल्यामुळे यापुढे विश्वास कोणावर ठेवायचा ? असा प्रश्न निर्माण झाला आहे रात्री उशिरा या घटने ची फिर्याद घेण्यात आली आणि घरगडी शिवा याला अटक करण्यात आली असून दोन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत रविवार असलेल्या बाजाराच्या दिवशी भर दुपारी घडलेल्या या घटने मुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली असून एकट्या दुखट्या निवासस्थानाच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे

# प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी सेल्फ सर्व्हे करून घ्या आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीड । प्रतिनिधी

**पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**



प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे**

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे ॲप देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून ॲपवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

**अडचण असल्यास संपर्क साधावा**

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात बाहेगव्हाण शाळा तृतीय; एक लाख रुपयांचे बक्षीस शाळेला सुपूर्द

वडवणी । प्रतिनिधी

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये शासनाने घोषित केलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळेने तालुका स्तरावरील तृतीय क्रमांक पटकावून एक लाख रुपयांचे बक्षीस जिंकले आहे. शाळेच्या बँक खात्यावर ही बक्षीसाची रक्कम जमा करण्यात आलेली असून या पैशातून शाळेच्या विकासाकरिता विविध उपकरणे व साहित्य खरेदी करता येणार आहेत. बाहेगव्हाण येथील सुजाण पालक व ग्रामस्थ यांनी याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश करांडे यांसह सर्व शिक्षकवृंद यांचे अभिनंदन करुन कौतुक केले.



याबाबत अधिक माहिती अशी की, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये शासनाने घोषित केलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळेने तालुका स्तरावरील तृतीय क्रमांक पटकावून एक लाख रुपयांचे बक्षीस जिंकले आहे. शाळेच्या बँक खात्यावर ही बक्षीसाची रक्कम जमा करण्यात आलेली असून या पैशातून शाळेच्या विकासाकरिता विविध उपकरणे व साहित्य खरेदी करता येणार आहेत. यामध्ये सर्व शिक्षकांनी मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख सुरेश करांडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शाळेची गुणवत्ता वाढवून व भौतिक सुविधा ग्रामस्थांच्या सहकार्याने पूर्ण करुन सदरील योजनेमध्ये सहभाग नोंदवला होता. या उपक्रमाचे मूल्यमापन तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व त्यांच्या टीमने केले होते. सदर मूल्यमापनात बाहेगव्हाण शाळेने तृतीय क्रमांक पटकावून बक्षीसास पात्र ठरली आहे. येणाऱ्या महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष ◀◀ पान ३ वर

# भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या डॉ.शैलेजा गर्जे यांना मातृषोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील डोईठाण येथील पद्मावती विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा आष्टीचे माजी नगरसेवक दादासाहेब उर्फ पप्पू गर्जे आणि माजी केंद्रप्रमुख सौ.मंगलप्रभा तांदळे आणि भाजप नेत्या डॉ.शैलजा गर्जे यांच्या मातोश्री प्रयागाबाई आनंदराव गर्जे (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्या मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या.जिद्दीने त्यांनी सर्व मुलांना, मुलींना उच्चशिक्षित केले.त्यांच्यावर ब्रम्हगाव रोडवरील गर्जेवस्ती येथे रविवारी रात्री अंत्यविधी झाला. अंत्यविधीस किशोरनाना हंबर्डे, डॉ.विलास सोनवणे, चेअरमन आदिनाथ सानप,राजेंद्र धोंडे, माजी तहसीलदार शहादेव गिते,कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, पत्रकार अनंत हंबर्डे,पत्रकार उत्तम बोडखे, आष्टी तालुका दूध संघाचे संचालक आत्माराम फुंदे, नगरसेवक सुरेश वारूंगुळे,बाळू शेठ गोल्हार, डॉ.राम सानप, डॉ.संतोष तांबे,राहुल मुथा,गिरीश जोशी,सुनील रेडेकर,शीतल मुथा,सचिन रानडे, ॲड.सुरेश शिंदे, ज्ञानेश्वर सोनवणे,संदीप हंबर्डे,बंडू हंबर्डे, श्रीखंडे,संबा तांदळे,यांच्यासह व्यापारी, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर वकील,प्राध्यापक, डॉक्टर, शिक्षक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# आता प्रगत समाजाने अप्रगत समाजाकडे लक्ष द्यावे –मानसोपचारतज्ञ डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिक्षण आणि समानतेच्या अधिकाराने वंचित समाजातील लोक काही प्रमाणात प्रगत झाले आहेत. आता त्या प्रगतशील घटकाने मागे राहिलेल्या समाजबांधवांकडे लक्ष देऊन त्यांची सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रगती कशी होईल याकडे लक्ष देऊन आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील शासनकर्ती जमात बनण्यासाठी सज्ज झाले पाहिजे अशी अपेक्षा सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

अंबाजोगाई तालुक्यातील धायगुडा पिंपळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजीत भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर त्वचारोग तज्ज्ञ डॉ.विजय फड, कान नाक घसा तज्ज्ञ डॉ.राहुल डाके, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.नामदेवराव जुने, बालरोग तज्ज्ञ डॉ.बळीराम मुंडे, रक्तपेढी विभागाचे डॉ.रवी गुंडरे यांची यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना ◀◀ पान ३ वर



# खोलेश्वर विद्यालयाची विद्यार्थिनी भावना साबळेचे यश

दिंद्रुड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत खोलेश्वर विद्यालय च्या ६२ विद्यार्थ्यांनी पात्र ठरत यश मिळवले आहे.इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी भावना भागवत साबळे हि शिष्यवृत्तीस पात्र ठरली असुन तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील खोलेश्वर विद्यालयात इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार भागवत साबळे यांची मुलगी भावना साबळे सह खोलेश्वर विद्यालया चे ६२ विद्यार्थी पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून पुढील



शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, विलास पारेकर, प्राचार्या सरिता फपाळ, रोहिणी पारेकर, मुख्याध्यापक संजय रायतेसर, पालकवर्गासह परिसरातून कौतुक होत आहे.

# आयटी कंपनीत निवड झाल्याने पुजा मोकाशी हिचा जोगेश्वरी पारगावकरांच्या वतीने सत्कार



जोगेश्वरी पारगाव । प्रतिनिधी

**ह.भ.प.बाळासाहेब महाराजमोकाशे यांची कन्याकुमारी पूजा बाळासाहेब मोकाशे हिने पुणे येथे कॉम्प्युटर इंजिनिअर पदवी घेऊन पूजाची निवड टेक महिंद्रा नामांकित आयटी कंपनी हिंजवडी पुणे येथे झाली आहे. करिता आष्टी तालुक्यातील पारगाव जोगेश्वरी येथील ग्रामस्थांच्या वतीने विठ्ठल मंदिर, पारगाव जोगेश्वरी ता आष्टी जि.बीड मायभुमी येथे इंजिनीयर पूजा हिचा सत्कार संपन्न झाला.**

यावेळी ह भ प आश्रू महाराज मोकाशे, सूर्यकांत मोकासे सर, रामकिसन मोकासे ,राजेंद्र भोराडे, पंडित मोकासे ,भीमराव सुरवशे, उजवीकडे पूजाच्या आई आशाताई मोकाशे पूजाचे वडील ह भ प बाळासाहेब महाराज मोकासे ,माजी ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत भोसले, बापूराव बळे, माजी सरपंच गणेश मोकाशे, रामभाऊ भोराडे, सुधाकर मोकाशे, बाळासाहेब सुरवसे, दत्तात्रय रोडे, ईश्वर बळे,ह.भ.प. सुरेश पाटील मोकासे, ह भ प दीपक महाराज कदम, शरद मोकाशे ,बाबासाहेब कदम, पूजाचे भाऊ नारायण मोकासे, महादेव सावंत फुले आदी उपस्थित होते.

# अंबानगरीत श्री गजानन विजय ग्रंथाच्या तीन दिवशीय सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन



## काल्याचे कर्तन, दिपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता

अंबाजोगाई प्रतिनिधी

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे अयोजन ७ मे ते १० मे दरम्यान सकाळी ७ ते१० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे.त्याची सांगता शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर पालखी उत्सव,महाआरती,महाप्रसाद सत्संग श्री गजाननाचा व ''श्रींची'' दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायाण सोहळ्यास व विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहान

संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप. वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपा अशीर्वादाने गेली १२ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे व भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन आयोजन केले जात आहे. प्रति वर्षाप्रमाने याही वर्षी ७ मे ते १०मे २०२५ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आसुन सोहळ्याचे हे वे१३ वर्ष आहे.तीन दिवशीय पारायण सोहळा प्रमुख हभप.आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते१०या वेळेत पारायण सोहळा पार पडणार आहे.पारायाण सोहळा कार्यक्रमा दरम्यान ◀◀ पान ३ वर

# सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मियांचे रक्तदान

## माजलगाव मठाचा आदर्श पायंडा; सामाजिक सलोख्याचे माजलगावात दर्शन



माजलगाव । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थान नेहमीच सामाजिक सलोख्याला प्राधान्यक्रम देत आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळयानिमित्त सर्वधर्मीय रक्तदात्यांनी सहभाग घेऊन सामाजिक सलोख्याचा आदर्श पायंडा पाडला आहे. धर्माच्या पलीकडे माणुसकीचे दर्शन घडविले, याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान, मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी सामाजिक सलोखा जपण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे.

माजलगावातील सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये आता आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्याचा निर्णय मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी घेतला. रविवार, दि.२७ एप्रिल रोजी माजलगाव मठात श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी हा संकल्प केला. यामुळे माजलगाव मठामध्ये आता धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य ◀◀ पान ३ वर

### ४९ जणांचे रक्तदान तर १४० जणांची नेत्र तपासणी

धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने यंदा श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतून जयंती उत्सवानिमित्त माजलगावकर मठात प्रथमच रक्तदान शिबिर व नेत्रतपासणी करण्यात आली. माजलगाव मठ संस्थान आणि माजलगाव ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित रक्तदान शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले तर आनंदऋषी हॉस्पिटल आणि मठाच्या वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिराचा १४० जणांनी लाभ घेतला. यातील ५० नागरिकांमध्ये डोळ्यांचे दोष आढळून आले. त्यांच्यावर आठ दिवसात आनंदऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे मोफत ऑपरेशन व उपचार केले जाणार आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुरंदर तालुक्यातील गावांचे 'सिटी सर्व्हे' रद्द करा ; जिल्हा नियोजन बैठकीत आमदार विजय शिवतारे यांची मागणी

सासवड : पुरंदर तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोजणी विभागाने सिटी सर्व्हे केलेले आहेत. हे सर्व्हे प्रचंड मोठ्या प्रमाणात चुकीचे केलेले असून गावागावातून नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. लोकांच्या खाजगी जागांना देखील या विभागाने शासनाचे नाव लावलेले असून हे नाव कमी करण्यासाठी लोकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे एकतर संपूर्ण सर्व्हे रद्द करावा किंवा लोकांना त्रास न देता एकखिडकी योजना तयार करून ह्या दुरुस्त्या करून द्याव्यात अशी मागणी पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे.



पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक विधान भवन पुणे येथे पार पडली. यावेळी बैठकीला जिल्ह्यातील आमदार खासदार, पुणे - पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शिवतारे म्हणाले की, गावागावात केलेल्या सिटी सर्व्हेमुळे कुठलाही फायदा न होता लोकांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. कुणाच्या जागा ग्राम पंचायत रेकॉर्डप्रमाणे लागलेल्या नाहीत तर कुणाच्या घराची नोंद होऊन अंगणाला सरकारचे नाव लागलेले आहे. यावर पालकमंत्री अजित पवार यांनी तत्काळ जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांना याबाबत कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

याशिवाय जिल्हा नियोजन बैठकीत पोलीस स्टेशन इमारतीसाठी जागा हस्तांतरण, नगरपालिका आवारात महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे आणि सासवड येथील बाजारासाठी दिवे गायरान क्षेत्रातील जागा हस्तांतरण करणे आदी विषयांवर देखील चर्चा झाली. यावेळी शिवतारे यांनी नव्याने अस्तित्वात आलेल्या फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदबाबत देखील महत्वाची मागणी केली.

शिवतारे म्हणाले की, नगरपरिषद अस्तित्वात आली असली तरी रस्ते, शासकीय इमारती आणि ॲमेनिटी स्पेस अशा मालमत्ता अद्याप नगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आलेल्या नाहीत. याशिवाय टीपी स्कीम क्र ६, ९ आणि १० या देखील मनपाकडून नगरपरिषदेला द्याव्यात. यावर पालकमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना तत्काळ हस्तांतरण करावे अशा सूचना दिल्या आहेत.

तलाव ताब्यात घ्यावेत - शिवतारे

पुणे शहराच्या आजूबाजूच्या गावात जमिनींना सोन्याचे भाव आलेले आहेत. त्यामुळे प्लॉटींग व्यावसायिक तलाव, ओढे बुजवून त्यावर प्लॉट बनवून विकत असल्याचे प्रकार दिसून आले आहेत. त्यामुळे मनपाने हे जलस्त्रोत संपादन केले नसले तरी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तत्काळ ताब्यात घ्यावेत अशी मागणी शिवतारे यांनी केली. यावर महापालिका आयुक्तांनी ताबडतोब कार्यवाही करावी असे आदेश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

## पुरंदर विमानतळाबाबत मुरलीधर मोहोळांनी केले वक्तव्य ; म्हणाले, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी

पुणे । प्रतिनिधी

**केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आज पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. मुरलीधर मोहोळ यांनी अनेक गोष्टींवर भाष्य केले आहे. मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत देशभरातील विमानतळ, धावपट्टीचे विस्तारीकरण, उडान योजना याबद्दल माहिती दिली. जवळपास दीड करोड प्रवाशांनी उडान योजनेच्या माध्यमातून मागच्या अडीच वर्षात प्रवास केला, असल्याचे मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.**

केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ बोलताना म्हणाले, उडान योजनेमुळे देशामधला विमान प्रवास सामान्य नागरिकांच्या आवाक्यामध्ये आला आहे. देशामध्ये कोलकाता,चेन्नई अहमदाबादनंतर आज पुण्यामध्ये उडान यात्री कॅफेचा शुभारंभ झाला आहे. आता सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडेल अशा दरामध्ये आता खाद्यपदार्थ या ठिकाणी मिळणार आहेत. मागच्या दहा वर्षांमध्ये देशातील विमान क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे.

देशात या आधी ७४ विमानतळ होते आता १६० झाले आहेत. २०४७ पर्यन्त देशात ४००० एअरपोर्ट असतील. पुण्यात नवीन टर्मिनल झाल्यानंतर प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली आहे. पुरंदर विमानतळबाबत बोलायच झाले तर कुठेही विमानतळ करायचं असेल, तर जागाराज्य सरकार देत असते. एमआयडीसीच्या माध्यमातून ही जागा संपादित केली जाते, असे मुरलीधर मोहोळ म्हणाले.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुरंदरचे विमानतळ हे पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय केला जाणार नाही. पुणे शहर आणि अन्य गोष्टींवर देखील त्यांनी




भाष्य केले आहे. मुरलीधर मोहोळ म्हणाले, * पुण्याच्या विमानतळाचा विचार करताना पुढच्या पन्नास वर्षाचा विचार आम्ही करत आहोत. त्यामुळे २०० एकर पेक्षा जास्त जागा ताब्यात घेण्याचा आमचं नियोजन आहे. पुढच्या काळामध्ये अधिकची सेवा पुणेकरांना कशी देता येईल, याचा आम्ही विचार करत आहोत.पुण्यात आम्ही मेट्रोचे विस्तारीकरण करत आहोत. त्या दृष्टीने ती अधिक वाढवता येईल यासाठी यांचे प्रयत्न सुरू आहेत. खडकवासला ते खराडी मेट्रो मार्गासाठी देखील महामेट्रोचे अधिकारी यांच्याशी बैठक झाली आहे.




## पुणे विमानतळावरून प्रवास करणाऱ्यांसाठी खास सोय! फक्त १० रुपयात चहा अन्

पुणे । प्रतिनिधी

हवाई प्रवास करताना योग्य दरात आणि गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ तेही स्वस्तात उपलब्ध व्हावेत. या उद्देशाने पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज ( दि २८) 'उडान यात्री कॅफे' या उपहारगृहाचा प्रारंभ करण्यात आला. नागरिक उड्डयन आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या कॅफेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विमानतळ संचालक संतोष ढोके व अन्य अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

'उड़े देश का आम नागरिक' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पानुसार आणि केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्या नेतृत्वात 'उडान यात्री कॅफे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली आहे. या कॅफेच्या माध्यमातून प्रवाशांना १० रुपयात पाणी आणि चहा, २० रुपयांत कॉफी, २० रुपयांत समोसा आणि २० रुपयांत मिठाई उपलब्ध होणार आहे. आजवर कोलकाता, अहमदाबाद आणि चेन्नई या विमानतळांवर ही सेवा सुरू करण्यात आली आहे. आता चौथे कॅफे पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर कार्यरत झाले आहे.

# पुण्यातील पोर्शे अपघातप्रकरणी मोठी अपडेट; अग्रवालला जामीन मंजूर

पुणे । प्रतिनिधी

कल्याणीनगरमधील हायप्रोफाईल पोर्शे अपघात प्रकरणात कारचालक अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या शिवानी अग्रवालला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. गेल्या दहा ते आकरा महिन्यांपासून याप्रकरणात १० आरोपी कारागृहात आहेत.



कल्याणीनगर परिसरात गेल्या वर्षी (१९ मे २०२४) भरधाव पोर्शे या आलिशान कारने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिली होती. अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणात येरवडा पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. अपघातापूर्वी अल्पवयीन मुलगा आणि त्याच्या मित्राने मुंढव्यातील एका पबमध्ये मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले होते. मुलाला ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीस आणल्यानंतर मात्र, विशाल अग्रवाल, त्याची पत्नी शिवानी यांनी ससून रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर यांच्याशी संगनमत करून रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. त्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञांना लाच दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी शिवानी अग्रवालला १ जून २०२४ रोजी अटक केली होती.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिकेमार्फत आपल्या अटकेच्या वैधतेला आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी देताना शिवानी अगरवालला अंतरिम जामीन मंजूर केला. तिच्या याचिकेवरील निकाल राखून ठेवण्यात आला आहे. अंतरिम जामिनाच्या अटी आणि शर्ती निश्चित करण्यासाठी तिने शिवाजीनगर जिल्हा सत्र सत्र न्यायालयात अर्ज केला. ड. अंगदसिंग गिल आणि ड. ध्वनी शहा यांनी बाजू मांडली.

न्यायालयाने घातल्या अटी

शिवानी हिने दर बुधवारी सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत येरवडा पोलीस ठाण्यात हजर राहावे, तसेच मोबाइल सुरू ठेवावा. न्यायालयाच्या परवानगीशिवाय परदेशात जाऊ नये, साक्ष, पुराव्यात छेडछाड करू नये, जवळच्या नातेवाइकांचे पत्ते, मोबाइल क्रमांक न्यायालयात द्यावे, अशा अटी न्यायालयाने घालून दिल्या आहेत. एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. एन. शिंदे यांनी जामीन मंजूर केला.

बडतर्फ सदस्यांकडून याचिका

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाला तीनशे शब्दांचा निबंध लिहिण्याच्या, तसेच वाहतूक पोलिसांबरोबर नियमन करण्याच्या अटींवर जामीन दिल्याप्रकरणी राज्य शासनाने बडतर्फ केलेल्या पुणे बाल न्याय मंडळातील दोन सदस्यांनी या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने याचिका दाखल करून शासनाला नोटीस बजावली आहे. बडतर्फ सदस्य डॉ. लक्ष्मण नेमा दानवडे आणि कविता तुळशीराम थोरात यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठाने राज्याच्या महिला आणि बाल विकास विभागाला नोटीस बजावली आहे. या प्रकरणी १८ जून रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

## पुण्यातील पीएमपी बसमध्ये धक्कादायक प्रकार ; चोरट्यांनी महिलांच्या दागिन्यांवर मारला डल्ला

पुणे : पीएमपी बस प्रवासात गर्दीचा फायदा घेउन चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील ७५ हजारांचे सोन्याचे गंठण चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी ५९ वर्षीय महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास मोरेबाग बसस्टॉप जवळ कात्रज ते अरण्येश्वर चौक सहकारनगर प्रवासादरम्यान ही चोरीची घटना घडली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कात्रज-कोंढवा रस्ता परिसरात राहतात. शनिवारी त्या कामानिमित्त पीएमपीएल बसने प्रवास करत होत्या. त्यावेळी बसमध्ये गर्दीचा फायदा घेउन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ७५ हजारांचे सोन्याचे गंठण चोरून नेले. अरण्येश्वर चौकात बसमधून खाली उतरताना महिलेला गळ्यात सोन्याचे गंठण दिसून आले नाही. त्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली आहे. अधिक तपास सहायक फौजदार बी. के. खुटवड करीत आहेत.

महिलेच्या पर्सवर चोरट्यांचा डल्ला



निगडी ते पुणे स्टेशन असा बसप्रवास करणार्या ३३ वर्षीय महिलेच्या पर्समधून चोरट्यांनी तब्बल १ लाख १७ हजार रूपयांचे दागिने चोरून नेले. दुपारी हा प्रकार घडला असून, याप्रकरणी महिलेने बंडगार्डन पोलिसांत तक्रार दिली आहे. महिला तळवडे परिसरात राहते. कामाच्या निमित्ताने पीएमपी बसने प्रवास करीत होती. त्यावेळी बसमध्ये गर्दीचा फायदा घेउन चोरट्यांनी त्यांच्या पर्सवर डल्ला मारला. पुणे स्टेशनवर उतल्यानंतर महिलेच्या लक्षात हा प्रकार आला. अधिक तपास उपनिरीक्षक परमेश्वर गर्कळ तपास करीत आहेत.

सोन्याची पाटली चोरली

स्वारगेट पीएमपीएल बसस्थानकातून निगडीच्या दिशेने जाणार्या ज्येष्ठ महिलेच्या हातातील सोन्याच्या पाटलीवर डल्ला मारला आहे. ५० हजार रूपये किंमतीची सोन्याची पाटली चोरून नेली आहे. याबाबत तक्रारदार ६६ वर्षीय जेष्ठ महिलेने खडकी पोलिसांत तक्रार दिली आहे. तक्रारदार बोपोडी येथे राहायला आहेत. त्या स्वारगेटला आल्या होत्या. नंतर घरी जाण्यासाठी बसमध्ये प्रवेश करत असताना चोरट्यांनी गोंधळ केला. महिलेच्या हातातील सोन्याची पाटली काही सेंकदात कापून नेली. अधिक तपास उपनिरीक्षक कस्पडे करीत आहेत.

## पुणे शहरात बनावट नोटांचा छापखाना असा झाला उघड; २८ लाखांच्या बनावट नोटा जप्त, महिला एजंटसह पाच जणांना अटक

पुणे । प्रतिनिधी

घरातच प्रिंटर व इतर सामग्रीने बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा शिवाजीनगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. टोळीकडून तब्बल २८ लाख ६६ हजार १०० रुपयांच्या बनावट नोटा आणि २ लाख ४ हजार रुपयांच्या खऱ्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. या नोटा छापण्याचे अत्याधुनिक साहित्यही जप्त केले आहे. याप्रकरणी दोन महिलांसह पाच जणांना अटक करण्यात आली आहे. ते एक लाखाच्या बदल्यात दोन लाखाच्या बनावट नोटा विकत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार कोटक महिंद्रा बँकेच्या सीडीएम मशिनमध्ये २०० रुपयांच्या ५५ बनावट नोटा जमा झाल्याचे दि. १७ एप्रिलला उघडकीस आले. बँकेने दिलेल्या तक्रारीनुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणाद्वारे पोलिसांनी आरोपी मनिषा स्वप्निल ठाणेकर (रा. येरवडा), भारती गवंड (रा. चिंचवड), सचिन रामचंद्र यमगर (रा. गहुंजे) यांना १८ एप्रिलला ताब्यात




घेतले.चौकशीत बनावट नोटांचा मुख्य पुरवठादार नरेश भिमप्पा शेट्टी (रा. लोहगाव) असल्याचे उघड झाले. पथकाने नरेशच्या घरी धाड टाकून २०० रुपयांच्या २० बंडल बनावट नोटा, ५०० रुपयांच्या २ हजार २३२ बनावट नोटा (मूल्य २२ लाख ३२ हजार रुपये), प्रिंटर, शाई, कोरे कागद व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त केला. याशिवाय नरेशच्या कारमध्ये बनावट २०० रुपयांच्या ६४८ नोटा, ५०० रुपयांच्या ३ नोटा मिळाल्या आहेत.दरम्यान, शेट्टीचा भागीदार आरोपी प्रभू गुगलजेड्डी यालाही पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडूनही बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. ही कारवाई पोलीस अपर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील, पोलीस उपायुक्त संदिपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, तत्कालीन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक के.बी. दाभेराव, पोलीस अंमलदार नलिनी क्षिरसागर, आदेश चलवादी, तेजस चोपडे, गणेश जावर, रुचिका जमदाडे, स्वालंहा शेख (एटीसी) यांनी केली आहे.

# ठाकरेंच्या पक्षाला गळतीचे ग्रहण! आता 'या' नेत्यांनी केला शिवसेनेत प्रवेश

पिंपरी: (वा.) लोणावळ्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून ज्येष्ठ माजी नगरसेविका कल्पनाताई आखाडे, नगरसेविका सिंधूताई परदेशी यांच्यासह उपशहरप्रमुख आणि विविध पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्वांचे शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी शिवसेना महिला उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख दत्ताभाऊ केदारी, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, युवासेना पुणे जिल्हा समन्वयक सागर पाचरणे, शिवसेना उप तालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, शिवसेना महिला लोणावळा शहर संघटिका मनीषाताई भांगरे, शिवसेना मावळ विधानसभा समन्वयक अंकुश देशमुख, शिवसेना उपशहर प्रमुख प्रकाश पाठारे, शिवसेना लोणावळा समन्वयक नंदू कडू, विशाल पाठारे उपस्थित होते.

ठाकरे गटाच्या ज्येष्ठ नगरसेविका कल्पनाताई आखाडे, नगरसेविका सिंधूताई परदेशी,उबाठा गटाचे लोणावळा उपशहरप्रमुख प्रकाश पाठारे, विजय खाडे, सह शहर संघटिका प्रियाताई पवार, विभाग संघटिका अनिताताई गायकवाड, विभाग संघटिका माग्रेट मुन्नास्वामी, विभाग प्रमुख मंगेश येवले, उपविभाग प्रमुख अनिल कालेकर, कल्पेश तिखे, दुर्वेश कडू, प्रणव तिकोने, संकेत जाधव, आदित्य शिंदे, दुर्वेश बोडके, प्रथमेश पाठारे यांच्यासह गंगाबाई हवालदार, अश्विनी सोपान पुनावडे, शुभम कदम, रोहित चिलवंत, सूरज भोईर, सागर दसवते, सौरभ गावडे, पियुष राजगुडे यांनी शिवसेनेते प्रवेश केला.



यावेळी बोलताना खासदार बारणे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नेहमी कार्यकर्त्यांसाठी उपलब्ध असतात. कार्यकर्त्यांना न्याय, ताकद देतात. त्यांच्या सुख, दुःखात सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन ठाकरे गटाचे अनेक पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करत आहेत. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे घेऊन जात आहे. महायुतीचे सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. सरकारचे निर्णय शिवसैनिकांनी जनतेपर्यंत पोहचविले पाहिजेत. आज शिवसेनेत प्रवेश केलेल्या सर्व पदाधिका-यांना सन्मानाची वागणूक दिली जाईल. कोणावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. सर्वांनी मिळून पुणे जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत करायचे आहे.

उद्धव ठाकरेंना रत्नागिरीत मोठा धक्का

ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना रत्नागिरीत मोठा धक्का बसला आहे. गेल्या ४० वर्षांपासून ठाकरे गटासोबत राहिलेले माजी जिल्हाप्रमुख सचिन कदम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. सचिन कदम यांनी वैयक्तिक कारणांमुळे पक्षाच्या पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ठाकरे गटाला हा मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे.

उद्धव ठाकरेंना रत्नागिरीत मोठा धक्का; ४० वर्षांपासून सोबत असलेल्या बड्या नेत्याने सोडली साथ

गेल्या काही वर्षांपासून ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव आणि सचिन कदम यांच्यातील उघड संघर्षामुळे हा निर्णय घेतल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या अचानक राजीनाम्यामुळे रत्नागिरीतील उद्धव गटात एकच खळबळ उडाली आहे. शिवसेनेत ४० वर्षे सक्रिय असलेले सचिन कदम यांची ओळख अनंत गिते आणि विनायक राऊत यांचे विश्वासू कार्यकर्ता म्हणून होती. त्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे.